# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

वर्ष 26 अंक 7 ऑक्टोबर 2015

या अंकात


| | | |
|---|---|---|
| 2. | सहिष्णुतेची खरी कसोटी | *नरहर कुरुंदकर* |
| 2. | अजून एका पुरोगामी विचारवंताची हत्या | *प्रभाकर नानावटी* |
| 4. | पत्रसंवाद | *मिलिंद सोनटक्के/कुणालशिरसाट* |
| 6. | पटेलांच्या आंदोलनातून निर्माण होणारे धोके | *भीमराव बनसोड* |
| 9. | थोड्याशांचे स्वातंत्र्य | *कोबाड गांधी/नंदा खरे* |
| 11. | निधर्मीपणा – धर्मनिरपेक्षता..... | *डॉ. रा. अं. पाठक* |
| 17. | शंका समाधान @शाखा | *जयदेव डोळे* |
| 20. | जीर्णशीर्ण हवेलीतला मार्क्सवादी! | *प्रवीण बर्दापूरकर* |
| 23. | शोषितांमध्ये असंघटित मध्यमवर्गीयही | *सीताराम येचुरी* |
| 24. | राक्षसाची पाउले | *संजीव खांडेकर* |
| 27. | जिकडे पैसा जास्त तिकडे आयायटीयन्स | *प्रभाकर मोरणकर* |
| 31. | प्रतिसाद | |



संस्थापक – संपादक
**दि. य. देशपांडे**
(1917-2005)

कार्यकारी संपादक
**प्रभाकर नानावटी**



**संपर्कः**

प्रभाकर नानावटी pkn.ans@gmail.com 9503334895

भरत मोहनी bharat_i@yahoo.com 9822736808

aajacha.sudharak@gmail.com

# सहिष्णुतेची खरी कसोटी

समाजात जर खरोखरी स्वातंत्र्य रूजवायचे असेल तर ती दुहेरी प्रक्रीया असते .एक तर इतरांच्या बाबतीत आपण सहिष्णू असावे लागते .आमच्या सहिष्णुतेच्या मर्यादा आपल्यापेक्षा वेगळा विचार करणाऱ्यांच्या बाबतीत उदासीनता इतक्याच आहेत .सहिष्णुतेची खरी कसोटी आपल्या श्रध्दांच्यावर आघात करणाऱ्या लिखाणांच्या विषयी आपण किती सहिष्णुता दाखवतो या ठिकाणी लागते .कुणी कुणाची मने दुखवायची नाहीत ,सर्वांनी एकमेकांच्या अंधश्रध्दा जपायच्या या दिशेने आपल्या सहिष्णुतेचा प्रवास चालू असते .मुळात ही दिशाच चूक आहे .सर्वांनीच सर्व बाबींची चिकित्सा करायची आणि या चिकित्सेबाबत श्रध्दा कितीही दुखावली तरीही सहिष्णुतेने वागायचे ,या दिशेने आपल्याला प्रवास केला पाहिजे .देशातील धार्मिक अंधश्रध्दा असणाऱ्यांच्या कोणत्याही श्रध्देय भूमिकेची चिकित्सा होताच जिथे निषेध होतात तिथे फारसे स्वातंत्र्य अस्तित्वात असू शकत नाही .

*नरहर कुरूंदकर*

'अभयआरण्य'

•••

## अजून एका पुरोगामी विचारवंताची हत्या

*प्रभाकर नानावटी*

चरित्र....जात-धर्म....श्रद्धा-अंधश्रद्धा

कर्नाटकातील हंपी विश्वविद्यालयाचे माजी उपकुलगुरू, डॉ. एम. एम. कलबुर्गी यांची धारवाड येथील त्यांच्या राहत्या घरी 30 ऑगस्ट 2015 रोजी सकाळी 8.40 वाजता अज्ञात इसमांकडून गोळी घालून हत्या करण्यात आली. कुठल्याही उपचारापूर्वीच त्यंचा जीव गेला होता. मृत्यु समयी त्यंचे वय 77 वर्षाचे होते. डॉ. एम. एम. कलबुर्गी हे ख्यातनाम साहित्य संशोधक, विमर्शक व जुन्या कन्नड लिपीचे अभ्यासक होते. कन्नड संस्कृती, कन्नड इतिहास, लोकगीत (जानपद) साहित्य, व्याकरण, ग्रंथ संपादन शास्त्र, इत्यादी विषयात त्यांनी संशोधन पर प्रबंध लिहिलेले होते. त्यांनी 41 प्राचीन ग्रंथांचे संपादन केले व शंभराहून जास्त संशोधित लेख लिहिले. याच बरोबर पुरोगामी विचारांचे प्रचारक, प्रसारक व काही प्रसंगी विरोध पत्करून स्पष्टपणे विधान करणारे होते.

अशा प्रकारे विचारवंतांची हत्या म्हणजे समाजाला एक कलंक आहे. तालिबान प्रवृत्तीच्या काही धर्मांध शक्ती या समाजात वावरत असून त्यांनी गेल्या दोन वर्षात डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉ. गोविंद पानसरे व आता डॉ. एम. एम. कलबुर्गी यांची दिवसा ढवळ्या हत्या करून पसार झाले आहेत. ऊठ सूट भारतीय संस्कृतीचे गुणगान करणारे नेहमीच आपण भारतीय फार सहिष्णु आहोत, आपल्या देशात विविध धर्मांचे, विविध विचार प्रणालीचे, विविध संस्कृतीचे लोक गुण्या गोविंदाने नांदतात आणि या सामाजिक वर्तनात आपल्या संस्कृतीचा फार मोठा वाटा आहे असे अभिमानाने ऊर

बडवून सांगत असतात. धार्मिक, आस्तिक, विविध पंथांचे उपासक, मूर्ती पूजक यांच्या बरोबरच धर्म नाकारणारे, देवाचे अस्तित्त्व नाकारणारे, धर्म चिकित्सा करणारे, समाजातील प्रचलित अंधश्रद्धा, कालबाह्य रूढी-परंपरा याबद्दल चिकित्सा करणारे इत्यादींनासुद्धा सहिष्णुतेने वागवले जाते, असा त्यंचा दावा असतो. परंतु डॉ. एम. एम. कलबुर्गी यांच्या खुनानंतर या अत्युच्च संस्कृतीतील ढोंगीपणा, खोटारडेपणा उघड होत आहे, असे म्हणता येईल.

दिवसा ढवळ्या एखाद्याच्या दरवाज्यावर बेल वाजवून दार उघडल्यानंतर बेछूटपणे गोळ्या झाडून एखाद्याची हत्या करणे इतपत या धर्मांधांची मजल गेली आहे. कायद्याचा धाक नाही, पकडण्याची भीती नाही, शिक्षा होण्याची शक्यता नाही, अशा परिस्थितीत हा समाज वावरत असल्यामुळे विचारवंतानी जिवंत राहायचे की नाही हा प्रश्न आता विचारावासा वाटतो. हिंदू धर्मासंबंधी अस कायदा वा तालिबानी टाइप मनोवृत्ती असलेल्यांची संख्या दिवसे न दिवस वाढत आहे. म्हणूनच कुणाचे विचार पटले नाहीत, किंवा लेखनात केव्हातरी धर्मांधांच्या विरोधात ओझरता उल्लेख आहे किंवा वागण्या-बोलण्या-लिहिण्यात देव-धर्माची, संत-महंतांची वेगळी बाजू मांडण्याच्या प्रयत्नात आहेत अशा सर्वांना लक्ष्य करून संपवायचेच या मनोवृत्तीचे कदापि समर्थन होऊ शकणार नाही.

डॉ. कलबुर्गी यांनी कर्नाटक सरकारसाठी समग्र वचन संपुट या नावाच्या ग्रंधाचे संपादन केले होते. त्यांना याच सरकारने पंप, वर्धमान या पारितोषकाने सन्मानित केले होते. त्यांच्या मार्ग या ग्रंथाला साहित्य अकॅडेमीचे पारितोषक मिळाले होते. डॉ. कलबुर्गी नेहमीच त्यांच्या भाषणातून व लेखनातून धर्मातील – विशेष करून लिंगायत जातीतील – विसंगती व अंधश्रद्धा यांच्यावर कडाडून टीका करत होते. 1989 मध्ये त्यांनी बसवेश्वरांच्या कालखंडातील वचन साहित्याचे संकलन मार्ग 1 मध्ये करून प्रकाशित केले होते. संशोधक वृत्तीने केलेल्या या ग्रंथात लिंगायत समाजातील मूठभर अभिमान्यांना )दुरभिमान्यांना) काही विधान आक्षेपार्ह वाटली. म्हणून त्यांना एकाकी पाडण्याचा घाट घातला. सल्मान रश्दीच्या सॅटानिक व्हर्सेस या पुस्तकासंबंधी उठलेल्या गदारोळाप्रमाणे कन्ड साहित्याच्या वर्तुळात मोठ्या प्रमाणात कलबुर्गींच्या विरोधात कुजबुज व नंतर उघड आक्षेप नोंदविण्यात आले.

कर्नाटकात लिंगायत समाजाचे वर्चस्व असून या समाजाचे आधिपत्य राज्यभर विखुरलेल्या हजारो लहान मोठ्या मठाधिपतींच्याकडून होत असते. महाराष्ट्रातील बुवा-बाबांसारखे चमत्कार, अघोरी उपचार यावर विसंबून न राहता हे मठाधीश लिंगायत समाजासाठी शिक्षण संस्था, हॉस्टेल्स, गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत बोर्डिंग अशा समाजोपयोगी कार्य करत असल्यामुळे संपूर्ण समाजात त्यांनी चांगलाच जम बसविला आहे. आणि हे मठाधीश स्वतःला पुरोगामी म्हणवून घेण्यात धन्यता मानतात. या मठाधीशांचे आदेश म्हणजे सामान्य लिंगायतांना प्रत्यक्ष देववाणीच असे वाटत असते. त्यामुळे कलबुर्गी यांना जेव्हा बसवेश्वरासंबंधी लिहिलेल्या विमर्शात्मक लेखनाला अकॅडेमिक सर्कलमध्ये विरोध होऊ लागला तेव्हा त्यांनी वैतागून बसवेश्वर वा बसवेश्वराच्या वचनसाहित्यावर यानंतर संशोधन करणार नाही असे निक्षून सांगितले. परंतु ही एका प्रकारे बुद्धीनिष्ठतेची आत्महत्याच आहे असे त्यानी सांगितले.

डॉ. दाभोलकरांच्या हत्येनंतर महाराष्ट्रातल्या प्रमाणे अंधश्रद्धा विरोधी कायद्याची ड्राफ्ट प्रत तयार करण्यात आली. या ड्राफ्टवर कर्नाटकात उलट सुलट चर्चा झाली. 1914 मध्ये ज्ञानपीठ पुरस्कृत कन्नड साहित्यिक डॉ. यू आर अंनंतमूर्ती यांनी अशा प्रकारचा कायदा हवा म्हणून जागोजागी भाषण देत होते. आणि त्याच वेळी डॉ. कलबुर्गी यांनी डॉ. अनंतमूर्ती यांना पाठिंबा दिला. एका भाषणात पूजेसाठी वापरत असलेल्या दगडी मूर्तीसंबंधी काही विधान केली. खरे पाहता अनतमूर्तींच्या नागड्याने केलेल्या पूजेचा निषेध या नग्नपूजेच्या प्रथेच्या विरोधातील या लेखाचा संदर्भ त्या विधानात होता. परंतु समाजातील कट्टर धार्मिकांना ही विधानं आक्षेपार्ह वाटल्यामुळे अनंतमूर्तीवर खटला भरण्यात

आला. काही दिवसात या विरोधाचे सूत्र विश्व हिंदू परिषद व बजरंग दल या मूलतत्त्ववादी कार्यकर्त्यांच्या हातात एकवटल्या. मंगळूरू, पुत्तूरू, उडुपी इत्यादी ठिकाणी कलबुर्गींचा फोटो जाळून निषेद करण्यात आला. कलबुर्गींना अटक करा अशा घोषणा देण्यात आल्या. कलबुर्गींच्या राहत्या घरावर दगडफेक झाली. त्यानंतर त्यंना पोलीस संरक्षणही देण्यात आले. आर्य समाजाचे संस्थापक दयानंद सरस्वती (1824-1883) यांनीसुद्धा दगडी मूर्तींच्या पूजेच्या विरोधात प्रक्षोभक भाषणं दिली होती. ते जर आज असते तर त्यांचीसुद्धा हत्या झाली असती, असे म्हणण्यास भरपूर वाव आहे.

खरे पाहता डॉ .कलबुर्गी हे धार्मिकच होते .फक्त त्यांनी धर्मचिकित्सेचा वसा घेतला होता .कलबुर्गी यांचे लेख बीदर येथील *अग्नी अंकुर* या कन्नड साप्ताहिकातून प्रसिद्ध होत होते .या साप्ताहिकाचे संपादक ,लिंगण्णा सत्यमपेटे हे कलबुर्गींचे चांगले मित्र होते .काही महिन्यापूर्वी लिंगण्णा यांचे प्रेत एका लिंगायत मठाजवळील गटारात सापडले . अजूनही त्या खुनाचा तपास लागला नाही .कलबुर्गींच्या लेखनात 800 वर्षापासून चाललेल्या विरक्तपीठ विरुद्ध पंचपीठ यांच्यातील एकमेकावरील कुरघोडींचा उल्लेख होता .ते या मठाधीशाना रुचले नव्हते .त्याच्या काही लेखात बसवेश्वर यांच्या लिंगायत धर्मात त्या काळच्या शेकडो जाती-जमातींनी धर्मांतर केले म्हणून हा धर्म टिकून आहे ,अशी विधानं होती .त्यांच्या लेखातील लक्ष्य लिंगायत मठाधीश असल्यामुळे त्यांचा राग कलबुर्गीवर होता .

बांगला देश येथे धार्मिकांच्या विरोधात लिहिणाऱ्या ब्लॉगर्सची होत असलेल्या हत्येप्रमाणे आपल्या येथील पुरोगामी विचारवंतांचा गोळी घालून ठार करण्याचे हत्यासत्र असेच होत राहिल्यास संस्कृतीची स्तुती करणाऱ्या भाटांचेच वर्चस्व यानंतर असणार आहे .लिंगायत समाजाचे आद्यपुरुष बसवेश्वर यांचासुद्धा त्या काळी खून झाला होता . )तुकारामाच्या वैकुंठ गमनाप्रमाणे बसवेश्वराची जलसमाधी असे गोंडस नाव त्याला दिले गेले होते (.कारण एका ब्राह्मण मुलीची दलित मुलाशी लग्न लावल्याचा आरोप त्यांच्यावर होता .

विचारांशी लढा देण्याची तयारी नसलेले कुठल्याही थरापर्यंत जाऊ शकतात हेच डॉ .दाभोलकर ,कॉ .पानसरे व डॉ . कलबुर्गी यांच्या संदर्भात अधोरेखित होते .आम्ही जे म्हणतो तेच सर्वांनी म्हटले पाहिजे आणि तसे न करणाऱ्यांना या जगात राहण्याचा अधिकार नाही व आम्ही त्यांना सुखासुखी जगू देणार नाही ,हाच संदेश हे धार्मिक दहशतवादी पोचवत आहेत .ज्या समाजाला) चिकित्सक (विचारांची कदर नाही तो समाज रसातळाला जातो ,हेच या संदर्भात पुन्हा एकदा सांगण्याची वेळ आलेली आहे.

pkn.ans@gmail.com

•••

# पत्रसंवाद

*मिलिंद सोनटक्के/कुणालशिरसाट*

विवेक....शिक्षण....मानसिकता

प्रिय मिलिंद,

कसा आहेस? आज फार अस्वस्थ व्हायला झालं म्हणून तुझ्याशी बोलावस वाटलं...

काल कर्नाटकात डॉ.कलबुर्गी सरांचा खून केला दोघाजणांनी सकाळीच. अगदी डॉ. दाभोलकर आणि पानसरे यांना मारलं ना तसच... काही लोक आता त्यांना बदनाम करणारे मेसेज फिरवत आहेत. तुला खर वाटेल त्यांनी संगितलेसं... डॉ. कलबुर्गी हे साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक तर होते पण त्या पलीकडे अनेक चांगले विद्यार्थी घडवणारे शिक्षक होते. ते मुलांना विचार करायला, प्रश्न विचारायला आणि समाज चांगला कसा होईल यासाठी कृती करायला शिकवत होते. अगदी डॉ.दाभोलकर आणि पानसरे सारखं.... पण त्यांचा खून केला. कोणी केला हे माहित नसलं तरी ........ तुला कळल ना हे कोण करतय ते ...

एखाद्या माणसाचे विचार पटले नाही म्हणून त्याचा खून करायचा हे मान्य आहे का तुला?नाही ना... मग तू शांत का? त्यांच्या विचारांच्या लढाईत तू का नाहीस...किती दिवस तू असं म्हणणार आहेस की मला काय फरक पडतो... मी काय करू शकतो....असं म्हणशील तर या पृथ्वीच सौंदर्य हे धर्माचा गैरवापर करणारे नष्ट करून टाकतील. खरा धर्म सांगितला पाहिजे आपण...माणुसकी नावाचा फ़क्त..... मी अपघाताने हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख झालो. पण मी आधी माणूस आहे.

माणसाने माणसाला मारणारी विचारसरणी मला मान्य नाही हे बिनधास्त पुढे येऊन बोल रे....नाहीतर उद्या आणखी एक विचारवंत, साहित्यिक हे लोक मारून टाकतील. आणि त्याला बदनाम करतील. तुला गुलाम व्हायच नसेल तर उठ... या गुलामीच्या बेडया तोड आणि चलं पुस्तक हातात घेऊन... लेखणी घेऊन... विचारांची लढाई लढू... यांच्या गोळ्या कमी पडतील आपल्याला संपून टाकायला...हे जग विचारांनी सुंदर होतं....धर्मापलीकडच्या, जातीपलिकड्या.... प्रेमाच्या विचारांनी... बंदूक घेऊन हिंसा आणि द्वेष करणाऱ्या विचारांनी जनावर पण जगत नाही रे!

कुणाल

**प्रिय कुणाल,**

तुझे पत्र वाचले. मीही फार अस्वस्थ झालो. पण कारण वेगळे आहे. तुझे पत्र वाचून दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी यांच्या खुनाची नैतिक जबाबदारी जणू माझ्यावरच आहे अशी भावना झाली. त्यामुळे मी अस्वस्थ झालो.

*एखाद्याचे विचार पटले नाही म्हणून त्याचा खून करणे मलाही मान्य नाही. तरीही मी शांत का? त्यांच्या विचारांच्या लढाईत मी का नाही?*

कारण या विचारवंतांचे विचार त्यांच्या खुनानंतरही नीटपणे माझ्यापर्यंत पोहोचलेले नाहीत. माझा धर्म निवडण्याचा अधिकार माझ्याकडेही नव्हता. मलाही तो इतरांप्रमाणेच मिळाला. लहानपणापासूनच्या स्पून फिडिंगने गणपती, रामायण, महाभारतातील पात्रेही मला आपली, जणू आपल्या घरातीलच वाटू लागली. तसे तुझे विचारवंत कधीच वाटले नाहीत. खोटे सुद्धा सतत बोलत राहीले तर खरे वाटू लागते, त्यामुळे मित्र, नातेवाईक, आई-वडील सभोवतालचे लोक सतत देव-धर्म आणि त्याचे तथाकथित शत्रू यांच्या बद्दल जे बोलतात तेच खरे वाटू लागले. गरम पाणी आणि बेडूक यांचा प्रयोग तुला माहीतच असेल, हळूहळू तापणाऱ्या पाण्याशी बेडूक स्वतःला जुळवून घेत राहिला व शेवटी मेला, पण त्यातून बाहेर पडला नाही.

दाभोलकरांचा खून झाल्यावर तुझे असेच पत्र आले होते. त्यानंतर दोन वर्षांनी आज. धर्मांध लोक रोज त्यांचा प्रचार रेटून करत असतात. रामराज्याचे आश्वासन देत असतात. आपुलकीने बोलत असतात. 'आपण', 'आपले' असे शब्द वापरतात. आज धर्मप्रसारक शाळेपर्यंत पोहोचले आहेत. मग विवेकवाद्यांकडून असे का घडत नाही? विवेकी

विचारवंतांच्या परिचयाच्या, त्यांचे विचार सोप्या भाषेत सांगणाऱ्या पुस्तिका सहज का उपलब्ध नाहीत? मान्य आहे की, धर्मांध लोकांइतका पैसा, लोकबळ विवेकवाद्यांकडे नाही पण आजच्या सोशल मिडियाच्या जमान्यातही ते का शक्य होत नाही? अविवेकी लोक जर सतत स्पून फिडींग करत असतील तर लोक कष्ट करून विवेकाची चव चाखायला कशाला येतील? चव कळण्यापुरते तरी विवेकाचे स्पून फिडींग करायला नको का? हे काम विवेकाच्या वारसदारांनीच करायला हवे ना?

सॉक्रेटीस, कान्ट, दे-कार्त, बर्कले, ह्यूम, हेगेल, स्पेन्सर, रसेल, चार्वाक, केशकम्बल, मक्खली गोसाल, गार्गी ही नावेही आम्ही ऐकली नाहीत. (आता गुगल सर्च करून लिहीली.) महावीर, बुद्ध, नानक केवळ धर्मसंस्थापक म्हणून माहीत आहेत. पण त्यांचे विचार माहीत नाहीत. संत आणि समाजसुधारकांनाही जातींनी वाटून घेतल्याने ते काय म्हणतात हेही माहीत नाही.

माणूस मारल्याने विचार मरत नाहीत, हे मान्य, पण असे म्हणल्याने ते वाढतही नाहीत. घोडा का आडला? भाकरी का करपली? पानें का कुजली? - फिरवली नाही म्हणून. तसेच विचार का खुंटले? याचेही उत्तर तेच आहे- फिरवले नाहीत म्हणून. फेसबुक, व्हाट्सॲपवर सामाजिक स्वास्थ्य बिघडवणारे, द्वेष पसरवणारे मेसेज फॉरवर्ड केले जातात. पण त्या मानाने विवेकी विचार नगण्यच असतात. ते वाढवण्याचे काम आपल्यालाच करायला हवे. त्यासाठी आपणही अभ्यास करायला हवा. यात तू मला मदत करशील ही अपेक्षा.

इतर कोणाहीप्रमाणे मीही बदलाला घाबरतो. ओळखीच्या वातावरणातच माणसाला सुरक्षित वाटते. विवेकाची बाजूच सत्याची, न्यायाची आहे हे तू माझ्यावर टीका न करता, मला न दुखावता पटवून द्यायला हवे. तू ज्यांना गुलामीच्या बेड्या म्हणतोस त्यांचाच मला आधार वाटतो. विवेकवाद जर मला भक्कम आधाराची खात्री देत असेल तरच मी बेड्या तोडायचे धाडस करीन. हा विश्वास तूच मला द्यायला हवा. हो ना? लढाईच्या वेळी मी त्याचीच बाजू घेणार ना ज्याचा मला विश्वास वाटेल. महाभारतातही कित्येक दिग्गज, विचारी योद्ध्यांना कोणाची बाजू घ्यावी याचा योग्य निर्णय घेता आला नाही. सामान्य माणूस नेहमी न्यायाच्या बाजूनेच असतो, पण विवेकाची बाजूच योग्य आहे. हे तुला पटवून देता यायला हवे. त्याच्या डोक्यात अविवेकी, प्रतिगामी, धर्मांध, जात्यांध विचारांचा सतत भरणा होत आहे. त्याच्या बुद्धीच्या कुवतीप्रमाणे त्यातले योग्य निवडतो. त्याला निवडीसाठी विवेकीविचार सहज व सोप्या भाषेत उपलब्धच नसतील तर तो काय निवडणार. मी विचार करणारच नाही असे नाही, तू विवेकवाद समजावून देणारे, एकतरी पत्र दर आठवड्याला पाठवशील अशी आशा करतो.

पत्रांची वाट पाहात आहे.
तुझा मित्र

milind.sontakke@gmail.com

•••

## पटेलांच्या आंदोलनातून निर्माण होणारे धोके

*भीमराव बनसोड*

**राजकारण....जात-धर्म....समाज**

गेल्या महिन्यात गुजराथमधील पटेल समाजाने खांद्यावर बंदूक घेउन वावरणाऱ्या 22 वर्षीय हार्दिक पटेलच्या नेतृत्त्वाखाली मुख्यमंत्री आनंदीबेन पटेलच्या नेतृत्त्वाला आव्हान देत सरकारविरोधात आरक्षणाच्या मुद्यावर जोरदार धुमश्चक्री केली. आजही भाजपचा पाठीराखा असलेला, जमीनजुमल्यावर बऱ्यापैकी मालकी असलेला, देशांतर्गत

व्यापारउदीमावर वर्चस्व असलेला, विदेशातही बळकट आर्थिक स्थान मिळवलेला, राज्य व केंद्र सरकारात मोठा सहभाग असलेला, सामाजिकदृष्ट्याही अस्पृश्य नसल्याने ब्राम्हणाखालोखाल वरचढ असलेला, खाजगी क्षेत्रात एस.सी,एस.टी व ओ.बी.सीं.ना आरक्षण नसल्याने त्या क्षेत्रातील 100 टक्के नोकऱ्या बळकावलेल्या, हिरे,मोती, जडजवाहिर व सुवर्णालंकार देशात विकणाऱ्या आणि विदेशात निर्यात करणाऱ्या या समाजाला आपण मागासवर्गीय असल्याचा शोध लागला आहे. आणि म्हणून ज्यांचा अशा व्यापार उदीमाशी काडीचाही संबंध नाही, शेतीशी केवळ शेतमजजूर म्हणूनच संबंध असल्याने यांच्या शेतीवर सालदार, महिनदार अथवा रोजंदार असलेल्या, ज्यांना रहायलाही हक्काचे घर नसल्याने कायम दारोदार भटकत असलेल्या, परंपरेने सामाजिकदृष्ठ्या  अस्पृष्य ठरवल्याने बहिष्कृत केलेल्या, यांच्या कारखान्यात मजूर म्हणून, दुकानावर नोकर म्हणून किंवा यांच्या मालाची उचलखाचल करण्यासाठी हमाल म्हणून काम करणाऱ्या, यांच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी पैसे घेवून प्रचार व मतदान करणाऱ्या समुदायातील मागासवर्गीयात आमचा समावेश करावा यासाठी त्यांनी आपली सर्व ताकद या आंदोलनात उतरविली आहे. त्यांना शांत करण्यासाठी राज्य सरकारला केंद्राची मदत घेउन अर्ध सैनिक दलांना पाचारण करावे लागले.

पोलिसांच्या गोळीबारात 8 लोक ठार झाले. राज्यभरातून 125 वाहने जाळून खाक करण्यात आली. सरकारी कार्यालये, पोलिस स्टेशन्स, मंत्री व आमदार-खासदारांच्या घरांवर हल्ले व जाळपोळ करण्यात आली. इतके सगळे झाल्यावरही कोणत्या आंदोलकांना अटक करून किती जणांवर खटले दाखल करण्यात आले? कोणाकडून किती नुकसान भरपाई मागण्यात आली? खरोखरच्या मागासवर्गीयांनी असेच आंदोलन केले असते तर त्यांनाही अशाच प्रकारे वागविण्यात आले असते काय? पोलिसांनी नेहमीप्रमाणेच याहीवेळी अतिरेक केला पण इतर आंदोलनाच्यावेळी तो जसा दबून जातो तसा तो आता हे प्रस्थापितांचे ओंदोलन असल्याने दबला नाही. अन्यथा खैरलांजी प्रकरणाच्यावेळी महाराष्ट्राच्या अनेक शहरातील दलित वस्त्यातून म्हणजे झोपडपट्ट्यांतून कोंबिग ऑपरेशन करून लहान थोरांना मारझोड करण्यात आली, कित्येक दलित तरूणांना रात्रीबेरात्री अटक करून त्यांच्यावर खटले दाखल करण्यात आले. याच्या तक्रारीही मानवी हक्क आयोगापर्यंत करण्यात आल्या, पण त्याची दखल घेण्यात आली नाही. या पटेल आंदोलनाच्यावेळी मात्र तसे झाले नाही. कारण त्या वस्त्या उच्च मध्यमवर्गीय पांढरपेशांच्या, सीसीटीव्ही कॅमेरे लावलेल्या होत्या. म्हणून न्यायालयानेही पटेलांच्या कारांच्या झालेल्या तोडफोडीची दखल घेतली. याबाबत मा.उच्च न्यायालयाने त्यांचे पिटीशान दाखल करून संबंधित पोलिसांवर कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहे. खरोखरच्याच मागासवर्गीयांच्या आंदोलनाची अशी दखल घेण्यात आली नसती असे आजपर्यंतच्या अनुभवावरून म्हणू शकतो.

देशवासियांना हे आंदोलन अचानकच इतके तीव्र कसे झाले याचे आश्चर्य वाटते. पण ते तसे नाही. याची तयारी बऱ्याच दिवसापासून योजनाबद्धरीतीने चालू होती. त्यासाठी  उभारलेल्या ‘पाटीदार अनामत आंदोलन समितीच्या’वतीने राज्यभर या समाजाच्या 340 सभा झाल्या. भाजपशी संबंधितच हा समाज असल्याने त्यांच्या कार्यकर्त्यांना, आर.एस.एस.च्या ‘स्वयंसेवकांना’ याची कल्पना होती. विश्व हिंदू परिषदेचे महामंत्री प्रवीण तोगडीया सोबत हार्दिक पटेल यांचे अनधिकृत असले तरी फोटो प्रसिद्ध झाले आहेत. तरीही त्यांच्या पक्षांच्या मंत्र्याची घरे जाळण्यापर्यंत समुदाय जाईल याची कदाचित त्यांना कल्पना नसावी. यासारख्या काही बाबी अस्पष्ट असल्या तरी या आंदोलनातून काही बाबी स्पष्ट झाल्या आहेत. त्या म्हणजे गुजराथच्या विकासाचा जो डांगोरा आतापर्यंत प्रसारमाध्यमांतून जाणीवपूर्वक पिटला जात होता त्याचे पितळ या आंदोलनातून ऊघड झाले आहे. याच समाजाच्या 6000 शेतकऱ्यांनी

मोदींच्या कारकिर्दीत आत्महत्या केल्याची बाब प्रसारमाध्यमांना सांगावीच लागली. एवढ्या मोठ्या आंदोलनाचे नेते हार्दिक पटेलनेच ती सांगितल्यामुळे ती दडवणे माध्यमांना शक्य झाले नाही. हीच बाब दलित व महिलावरील अत्याचाराच्या बाबतीत, तसेच लहान सहान धार्मिक दंगलीच्याबाबतीतही खरी आहे. पण ते हार्दिक पटेलने जाहीर केले नसल्याने त्याची बातमी झाली नाही.

इतक्या 'विकसित' राज्यात एवढ्या मोठ्या संख्येने या समाजाच्या षेतकऱ्यांनी आत्महत्या केली याचा अर्थ या समाजातील काही ठराविक टक्के लोकांचीच प्रगती झाली हे ऊघड आहे. या समाजातील बहुसंख्य लोक (सामाजिक नव्हे) आर्थिक हलाखित असतीलही. पण मग हीच बाब तर दलितांच्या बाबतीतही खरी आहे. त्यांच्यातीलही एक मध्यमवर्गीय थर आर्थिक सवलतीमुळे पटेल समाजाइतका नसला तरी पूर्वीपेक्षा थोडा बरा आहे. पण मग त्याचाच बाउ करून त्यांच्या सवलती काढण्याच्या बाता का बरे करण्यात येतात?

तेंव्हा सर्वच क्षेत्रात दबदबा असलेल्या पटेल समाजाला आता शिक्षण व नोकरीच्या क्षेत्रातील मागासवर्गीयांच्या सवलती हव्या आहेत. हीच मागणी राजस्थानच्या गुर्जरांनी, हरीयाणा, उत्तर प्रदेशादी राज्यातील जाटांनी, महाराष्ट्रातील मराठ्यांनी व आता धनगरांनी, देषातील मुस्लीमांनी, केल्या आहेत. पुढे मागे कर्नाटकचे लिंगायत, आंध्रातील रेड्डीही करतील. पण या सवलती देण्यामागे जो सामाजिक उद्देश्य आहे, भारतीय राज्य घटनेतील ज्या तरतुदी आहेत, याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी जे निकाल दिले आहेत, त्या कसोटीवर ही मागणी टिकाव धरू शकत नाही, हे ऊघड आहे. त्याच कारणामुळे मुख्यमंत्री आनंदीबेन पटेल यांनी ही मागणी धुडकावून लावली आहे. तरीही देशभरातून या मागणीसाठी वरील सर्व समाजाच्या सभा, बैठका घेण्याचे व देशातील वातावरण तापविण्याचे श्री हार्दिक पटेल यांनी जाहीर केले आहे. त्या कामाला त्यांनी मध्यप्रदेशातून सुरवातही केली आहे. महाराष्ट्रातील मराठा सेवासंघाचे नेते श्री पुरूषोत्तम खेडेकर यांनीही हार्दिक पटेलचे महाराष्ट्रात हार्दिक स्वागत करण्याचे जाहीर केले आहे. आता हीच मागणी घेउन ब्राम्हण, ठाकूर, वैष्णव, राजपूत, सिंधी, कंसारा, सोनी आणि रघुवंशी या गुजराथमधील समुदायांनीही आंदोलनाची भाषा सुरू केली आहे. देशभरातील यासारखेच इतरही समाजविभाग ही मागणी घेउन पुढे येण्याच्या तयारीत आहेत. गुजराथ, राजस्थान, हरीयाणा, मध्य प्रदेश यासारख्या राज्यात भाजपचीच सत्ता आहे. तेच या आंदोलनाला खतपाणी घालत आहेत अशी शंका काहींनी व्यक्त केली आहे.

ते कदाचित खरे असेल किंवा नसेलही, पण आर.एस.एस. व त्याची राजकीय आघाडी भा.ज.प. हे राखीव जागांच्या, दलित मागासवर्गीयांना आर्थिक व इतर सवलतींच्या विरोधात आहेत हे तर सर्वज्ञात आहे. मंडल आयोगावरूनही त्यांनी देशभर जो धुमाकूळ घातला होता त्यामुळे त्यांचे हे धोरण जगजाहीर झाले आहे. भारतीय राज्य घटनेच्याही ते विरोधातच आहेत. अयोध्येतील राममंदिरासारखे प्रश्न त्यांच्या 'आस्थेचे' असल्याने सर्वोच्च न्यायालयाचे निकालही कसे मानायचे असा त्यांच्यापुढे प्रश्न आहे. तेंव्हा अशा परिस्थितीत हे आंदोलन त्यांनी उभे केले असेल किंवा नसेलही पण ते त्यांच्या पथ्यावर मात्र पडू शकते हे नक्की. प्रत्येक राज्यात या आंदोलनाला विरोध करून आपल्या सत्तेचा आधार असलेल्या उच्च वर्णीयांचा, वर्गीयांचा रोष पत्करल्यापेक्षा भडकत असलेल्या या आगीचा दुरूपयोग करून 'आरक्षणाचा खटका' कायमचाच मिटविला तर त्यांचे काय बिघडेल? हार्दिक पटेल यांच्या आंदोलनाची मागणीच ही आहे की, 'एक तर आम्हाला आरक्षण द्या अन्यथा कोणालाच देऊ नका'. या मागणीचे इंगितही यातच दडले आहे. त्यांची ही मागणी पूर्ण करण्यात आर.एस.एस. व भाजपला भारतीय राज्य घटना, सर्वोच्च न्यायालयाचे निकाल आड येत आहेत. तेंव्हा त्यांना मान्य नसलेली ही भारतीय राज्य घटनाच धुडकावून लावण्याचे पण ते नच जमल्यास त्यात

दुरूस्त्या करण्यासाठी लागणारे दोन-तृतियांश बहुमत मिळवून देण्याचे पुढील निवडणुकीची तयारी म्हणून जनतेला आवाहन करण्याचे अथवा विद्यमान परिस्थितीत आहे त्या घटक पक्षावरही दडपण आणण्याचे डावपेंच ते आखू शकतात. अर्थात त्यांना हे इतके सोपे नसले तरी त्या दिशेने पाउल टाकायला त्यांना काय अडचण आहे? यासाठी राज्याराज्यातून असलेल्या या तमाम मध्यम शेतकरी जातींचा त्यांना भक्कम पाठिंबा देशभर उभा करता येऊ शकतो. त्यांचे त्यात कोणतेच नुकसान नाही.याविरोधात दलित, आदिवासी, ओबीसी हा वर्ग उभा राहील. तोही आंदोलनाचा मार्ग घेईल. त्यातून परस्परविरोधी आगडोंब उसळेल तर त्यानेही भाजपचे काय बिघडेल? राज्याराज्यातून व देशभरातूनही असा आगडोंब उसळविण्यात तर ते माहिरच आहेत. या पद्धतीनेच तर ते ठिकठिकाणी व वेळोवळी सत्तेत आलेले आहेत. समाजात दुही माजवणे, धार्मिक व जातीय विद्वेश निर्माण करणे, विशिष्ट समाजाचे धृविकरण करणे हाच तर त्यांच्या राजकारणाचा पाया आहे. अयोध्या प्रकरणावरून 1992 मध्ये देशात उफाळलेल्या धार्मिक दंगली व 2002 मधील गुजराथमधील कत्तली ही त्याची काही थोडी उदाहरणे आहेत. याप्रकारे त्यांना त्यांचा पूर्वीचा छुपा असलेला पण आता त्यांच्या सहकाऱ्यांनी वेळोवळी जाहीर केलेला अजेंडा या निमित्ताने पुढे नेता येणार नाही काय? अषा संघर्षाशिवाय त्यांना तो पुढे कसा नेता येईल? नाहीतरी देशातील राज्यकर्ता भांडवलदार, कारखानदार वर्गही राखीव जागांच्या विरोधातच आहे, हे त्यांनी गुणवत्तेच्या नावाखाली अनेकदा सरकारला शिष्टमंडळे भेटून जाहीर केले आहे. शिवाय कष्टकरी वर्गांच्या सर्व पातळीवरील सर्व सवलती निरनिराळ्या निमित्ताने काढून घेणे हा तर नवीन आर्थिक व औद्योगिक धोरणाचा महत्वाचा भाग आहे. तेच धोरण भाजप इतर कोणाहीपेक्षा जास्त जोरकसपणे राबविण्याचा प्रयत्न करीत आहे. फॅसिझमकडे जाण्याचा तो एक राजमार्ग आहे.

bhimraobansod@gmail.com,

●●●

## थोड्याशांचे स्वातंत्र्य

*कोबाड गांधी*

राजकारण....मानसिकता....समाजकारण

मला स्वातंत्र्यावर लिहायला सांगणे हे काहीसे व्यंगरूप आहे, कारण मी गेली सहा वर्षे एका तुरंगातल्या ‘ बाले ’- तुरूंगात (तिहार जेलच्या अति धोकादायक कैदी विभागात) कोंडलेला आहे. इथे मुख्य तुरूंगात जाण्याचे किंवा आजारी पडल्यास इस्पितळात जाण्याचेही स्वातंत्र्य नाही.

अराजकापासून लोकशाही केंद्रीकृत सत्तेपर्यंतच्या पटात स्वातंत्र्य कुठेतरी बसवले जाते ती तशी ही एक सापेक्ष संकल्पना आहे. पण जी कोणती व्यवस्था असेल तिच्यात काही जणांना इतरांपेक्षा जास्त स्वातंत्र्य असते. भारतात ‘सितारे’ - सिनेक्षेत्रातील क्रीडा क्षेत्रातील, उद्योगधंद्यातील वा राजकारणातील - पूर्ण स्वातंत्र्य उपभोगत असतात; अगदी खून करण्याचेही. उपासमारी भोगणाऱ्या शेतकऱ्यांना मात्र आपल्या मुला-बांळाना दोन वेळचे जेवण वा आजारपणात उपचार करण्याचेही स्वातंत्र्य नाही. मला तुरूंगवास हा कोंडून घालण्यासारखा आणि स्वातंत्र्य हिरावून घेण्यासारखा वाटतो, तर सराईत भुरट्या गुन्हेगाराला तसे वाटत नाही. त्याला तुरूंगात स्वातंत्र्य नसल्याचे जाणवत नाही, व तो सुटकेनंतर पुन्हा येथे येण्याचे प्रयत्नही करू शकतो.

स्वातंत्र्य हा शब्द अनेकदा विकृत अर्थानेही वापरला जातो पाश्चात्य देशांतील माध्यमांमधून केले जाणारे तरल बुध्दिभेदही स्वातंत्र्य म्हणून वर्णन केले जातात; चीन सारख्या देशांतील नियंत्रित माध्यमे स्वातंत्र्य या वर्णनात बसत नाहीत. अमेरीका आणि भारत हे दोन देश लोकशाहीवादी व सर्वाधिक स्वातंत्र्य देणारे मानले जातात. पण अमेरीकेतील काळ्यांना किंवा भारतातील दलितांना तसे वाटते का, हेही विचारून पाहावे. दलितांना ब्राम्हणी शासकांपेक्षा ब्रिटीश बरे होते असे वाटते; कारण ब्रिटिशांचे जात्याधारित दमन उघड नव्हते, तर आजच्या अवर्णीयांचे वागणे बटबटीत, अमानुष व घृणास्पद आहे.

जीवनाच्या इतरही क्षेत्रांत अशी स्वातंत्र्याच्या संकल्पनेची विकृती दिसते, भलेही ती इतकी उघड नसेल. उदाहरण म्हणून पोलीस आमच्याशी कसे वागतात ते पाहा. कोर्टात जाताना मला एका गाडीतल्या तीन फूट औरस-चौरस पिज-याच कोंडणे, त्यांना चालते- त्या पिजं-यात उन्हाळ्यात श्वासही धड घेता येत नाही. कैद्याचे वय, तब्बेत इ. काहीही या कोंडणुकीच्या आड येत नाही. कोर्टात पोचताच आमची मानहानीकारक शारीरिक 'तपासणी' केली जाते, जिच्या दरम्यान पेन ही संशयास्पद मानले जाते; एकदा तर चष्माही. आम्हाला नातलग, वकील, कोणाशीही संवाद साधू दिला जात नाही. तुरूंगातल्या 'डॉन्स' ना मात्र असे काहीही भोगवे लागत नाही. या सर्व व्यवहारांत पोलीस भारतातील स्वातंत्र्य व लोकशाहीवर बढायाच्या गप्पाही मारतात. ज्यांवर गुन्हे सिध्द झाले आहेत अशांनाही मानाने वागवावे, असे नियमावली व अनेकानेक कोर्टाचे निर्णय सांगतात; आरोप सिध्द होण्यापूर्वी तर हे घडायलाच हवे पण हे नियम पुस्तकांमध्येच राहते. एकूण गुन्हेगारी खटल्यांची न्याय व्यवस्था कैद्याचा आत्मसन्मान चिरडण्याचेच काम करते; अर्थातच, शेठ लोक चित्रतारे-तारका व डॉन्सना हे लागू नसते.

न्यायसंस्थाही इतर संस्थांपेक्षा, क्षेत्रांपेक्षा न्याय वागत असली तरी, काही ताजे निवाडे शंकास्पद आहेत, व यांत सर्वोच्च न्यायालयही येते. माझ्याच केसेस पाहा: त्यांचा पाया आहे एक खोटा कबूलीजबाब, जो म्हणे मी तेलगंणातील पोलिसांना दिला. त्यावर माझी सही नाही. तो तेलगू भाषेत आहे, जी मला ना लिहिता-वाजता येते, ना समजते. कोर्टातही मी असा कबुलीजबाब दिल्याचे नाकारले आहे. त्या आधाराने माझ्यावर दहा-पंधरा खटले भरले गेले आहेत. आज फक्त दोन खटल्यांत आरोपपत्र ठेवले गेले आहे व या खटल्यात उच्च न्यायालयाने मला जामीन दिला आहे. इतर खटले मात्र प्रलंबित आहेत. दिल्लीच्या नायब राज्यापालाने दिल्लीतील खटल्यांचा निकाल लागेपर्यंत मला दिल्लीबाहेर जाण्याची मनाई केली आहे. म्हणजे कायद्यांत (de jure) नसला तरी प्रत्यक्षात (de facto) दिल्लीचा नायब राज्यपाल आंध्र व तेलंगण कोर्टाच्या वर आहे.

याचा अर्थ हाच, की स्वतंत्र्याची संकल्पना व्यक्तिसापेक्ष आहे. ती असणारही आहे. वास्तवात माणुसकी व न्याय यांच्या आधाराशिवाय स्वातंत्र्य निरर्थक आहे. ते फक्त पाश्चात्य शब्दकोशातच केवल रूपात भेटते. खरे तर त्या मुक्त जगातही (free world) स्वतःला मुक्त समजणारे बहुतेक जण गंड, स्वतःबद्दलच्या शंका, असुरक्षितता इत्यादींच्या जंजाळात अडकलेलेच असतात. आणि जर मी अशा (मानसिक) तुरुंगात असेन, तर त्याचा माझ्या भोवतालावरही परिणाम होतो. खुलेपणाचा सार्वत्रिक अभाव सर्वच वातावरणाला कृत्रिम बनवते, आणि यातून व्यक्तीव्यक्तींमध्ये मुक्त संबंध अशक्य होतात. त्यांच्या जागी डावपेच, कुरघोडी करण्याचे प्रयत्न, नाटकी व कपटी वागणूक, अशा बाबी घेतात. आणि जे या वातावरणातून सुटून पळू पाहतात, ते तसे करू शकत नाहीत, कारण ते अडकलेलेच असतात.

आपण स्वातंत्र्याची चर्चा कमी करून माणुसकी व न्याय यांची चर्चा करायला हवी. जर माणुसकी व न्यायभावना वाढल्या तर स्वातंत्र्य आपोआपच सोबत येईल. माणुसकी व न्याय यांचे वजन वाढेल, त्या प्रमाणातच स्वातंत्र्यही वाढेल.

कोणास मुक्त माणसांचा खरा भाव पाहायचा झाला तर केवळ आसपासच्या मुलांकडे पाहावे. त्यांच्या वागण्यात उत्स्फूर्तपणा असतो. मनांतले सर्व भाव; आनंद, राग, दुःख, खिन्नता, सारे थेटपणे मुलांच्या चेहऱ्यावर दिसतात. प्रौढांमध्ये असा नैसर्गिकपणा आल्यास आजच्या कुढ्या समाजजीवनात ताज्या वाऱ्याचा झोत आल्यासारखे होईल. प्रौढ व्यक्तित असा मुक्त, निरागस भाव मला माझी दिवंगत पत्नी अनुराधा हिच्यात दिसत असे. पदव्युत्तर वर्गासाठीची प्राध्यापक असूनही तिच्यात लहान मुलाची निरागसता होती, हातातल्या कामाविषयी उत्कट बाव होता व न्यायाबाबतचा प्रचंड हळवेपणा होता. फेनिक्स ग्रीनच्या शब्दांत ती 'माणूस होण्यासाठी मुक्त' (free to be human) होती.

(कोबाड गांधी 'बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायद्याखाली दिल्लीच्या तिहार जेलमध्ये न्याय मिळण्याची वाट पाहत आहेत. वरील लेख हा इंडियन एक्सप्रेसच्या 15 ऑगस्ट 2015 तील 'Only Some Are Free' या लेखाचे भाषांतर आहे.)

अनुवादः नंदा खरे

*टीपः कोबाड गांधींचा वरील लेख वाचून पुण्यातील 'अक्षर नंदन शाळेच्या ध्वजवंदनाच्या कार्यक्रमाला गेलो. शालेय स्वातंत्र्यदिनाचे इतर उपचार आटोपल्यानंतर काही माजी विद्यार्थ्यांनी एक जाहीर विनंती केली. ती मुले नर्मदा बचाव आंदोलनाची पाहणी करण्यास गेली होती, व या वर्षात वाढणाऱ्या सरदार सरोवराच्या धरणाच्या उंचीने किती गावे पाण्यात जातील याची माहिती त्यांनी उपस्थित विद्यार्थी, पालक, शिक्षक, इत्यादींपुढे मांडली. सोबतच या गांवातील लोकांसोबत सहवेदना व्यक्त करण्याचे आवाहन त्यांनी केले.*

*असे कळते की, आजच्या सरकारच्या काही समर्थकांनी शाळेतल्या शिक्षकांना असले 18-20 वर्षाच्या मुलांनी केलेल्या तीनेक मिनिटाच्या भाषणाला परवानगी दिल्याबद्दल जाब विचारला!*

*मला तरी स्वातंत्र्य भावनेचा या वागणुकीने अवमान झाला असे वाटते. विरोधी मताची हलकिशीही अभिव्यक्ती आजच्या सत्ताधाऱ्यांना मनोमन घाबरवते असे दिसते.*

vidya_nand@hotmail.com,

●●●

# निधर्मीपणा - धर्मनिरपेक्षता - सर्वधर्मसमभाव - इहवाद (उत्तरार्ध)

*डॉ. रा. अं. पाठक*

इहवाद.... देव-धर्म.... नीती

### भारतीय धर्मनिरपेक्षतेचा राजकीय आशय

Secularism - धर्मनिरपेक्षता याला भारतात वेगळा अर्थ व त्याचे वेगळे परिणाम आहेत. पाश्चात्याप्रमाणे हा शब्द येथे कार्यान्वित होत नाही. कारण भारत हा एक बहुधार्मिक देश असून याला उपनिषदांचे सर्वधर्मसमभावाचे जबरदस्त

अधिष्ठान आहे. याच बरोबर येथील संरंजामशाही राज्य व्यवस्थेमध्ये सर्व धर्मामध्ये समन्वयाची व बंधुभावाची भावना असल्यामूळे धर्म-निरपेक्षतेचा प्रश्नच कधी आला नाही.

पण19 व्या शतकात ब्रिटिश राजवटीत, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पट बदलून गेला. ब्रिटिश राज्यकर्त्यानी फोडा व झोडाची राजनीती स्वीकारली. यामूळे मध्ययुगीन संस्कृतीच्या इतिहासावर परिणाम होऊन नवीनच विस्कळीत इतिहास निर्माण झाला. हिंदू-मुसलमान यांची समभावाने वागण्याच्या वृत्तीत बदल होत गेला. यातून आर्थिक आणि राजकीय चढाओढीचे राजकारण सुरु झाले. यातुन भारतीय कॉंग्रेसने 1885 साली विविध धर्माचा विचार करुन धर्मनिरपेक्षतेचे भारतातील धोरण स्वीकारले. यामध्ये पंडित जवाहरलाल नेहरु व महात्मा गांधी यांच्या विचारांचा पगडा दिसून येतो. नेहरु हे संपूर्णपणे पाश्चात्य Secularism चा पाठपुरावा करणारे ज्यांत ऐहिकतेलाच महत्व तर महात्मा गांधी धर्माधिष्ठीत जीवन पध्दती मानणारे.

यातून असे जाणवते कीं, भारतीय धर्मनिरपेक्षता अधिकतर तत्त्वज्ञानापेक्षा राजकीय स्वरुपाची दिसून येते. कारण भारतीय कॉंग्रेसने धर्मनिरपेक्षता जागतिक तत्त्वज्ञान म्हणून स्वीकारले नाही तर सर्व जमातीसाठी एक राजकीय तडजोड म्हणून स्वीकारलेलं तत्त्व आहे कारण येथे विविध संप्रदाय व जातीचे समूह होते. सत्तेचा बटवारा योग्य होऊ शकत नाही म्हणून हिंदुस्थान - पाकिस्तान निर्माण झाले.

भारताच्या फाळणीनंतर बरेच मुस्लीम भारतात होते. महात्मा गांधी आणि नेहरु यांनी निधर्मी राज्य व्यवस्थेचे समर्थन केले. आणि राज्य शासनास धर्म राहणार नाही पण नागरिकाना त्यांचा धर्म पाळता येईल. अशा तऱ्हेने भारत राजकीयदृष्ट्या निधर्मी राहिला आणि जनता धार्मिक राहू शकली.

येथे हे लक्षांत घेतले पाहिजे कीं, ब्रिटिश काळापासून भारतात धार्मिकता आणि निधर्मी यांच्यांत भेद नव्हता तर निधर्मी आणि जातीयता यांच्यात होता. पाश्चात्य देशांत मुख्य झगडा हा चर्च आणि राज्य शासन यांच्यात होता किंवा चर्च आणि नागरी संस्था यांच्यात होता. पण भारतात हिंदू किंवा मुस्लीम यांच्यात चर्च सारखे कांही नव्हते. म्हणून येथे निधर्मी व धार्मिकतेत झगडा नव्हता. मुख्य झगडा निधर्मी आणि जातीमध्ये होता. जातीय शक्ती मग त्या हिंदू असोत किंवा मुस्लीम असोत त्या सत्तेसाठी वापरण्यात आल्या.

या धर्मनिरपेक्षतेच्या कल्पनेमुळे धर्म व संप्रदाय यांची भाषा बंद होऊन व्यवहारांत तात्त्विक संप्रदायाची जागा संख्यात्मक संप्रदायाने घेतली. कारण लोकशाहीमध्ये संख्या बळाला महत्व असते. त्यामुळे समाजास बहुसंख्यात्मक व अल्पसंख्यात्मक रुप प्राप्त झाले. आता अशा निधर्मीपणाचा हा फायदा झाला की तोटा? हा प्रश्न सतत पडत आहे.

**भारतीय धर्म निरपेक्षता - सद्यस्थिती**

भारतीय धर्म निरपेक्षेतेची कल्पना धार्मिक नियम हे राज्य शासनास बांधील नसून सर्व धर्माशी समभावाचे असतील. भारतीय संविधानाच्या 42व्या सुधारणेमध्ये Secularism - सर्वधर्मसमभाव हा शब्द 1976 साली घालण्यात आला. पण भारतीय संविधान किंवा कायदा हा धर्म/संपद्राय व राज्य शासनाच्या नात्याची व्याख्या करीत नाही. भारत या राष्ट्राला कोणता धर्म नाही. नागरिकांना कोणताही धर्म आचरणात आणता येतो तरी राज्यासमोर सर्व नागरीक समान आहेत. या सर्वधर्माला सारखी वागणूकीच्या प्रयत्नात बरेच प्रश्न भारतासमोर उभे आहेत कारण प्रत्येक धर्माचे नियम वेगवेगळे आहेत. आणि विचारधारा आचारधारा वेगळी आहे.

संविधानाचे7 वे शेडयूल असे सांगते की धार्मिक संस्था, धार्मिक न्यास किंवा धार्मिक धर्मादाय संस्था या Concurrent list या सदराखाली येऊ शकतात. याचा अर्थ असा होते की भारतातील प्रत्येक राज्य आपल्या राज्यातील धार्मिक

संस्थाबद्दल त्याचे वेगळे नियम करु शकते. जर केंद्र आणि राज्यातील नियमामध्ये कांही तफावत समोर आणली तर केंद्र सरकारचा या बाबतीतला कायदा ग्राहय धरला जाईल.

एकंदरीत भारतातील निधर्मीपणा हा राज्यशासन व धर्म वेगवेगळे मानीत नाही तर त्याऐवजी सर्वधर्मांकडे तटस्थेने पाहतो. यामुळे बराच गोंधळ उडत गेल्याचे जाणवते. त्यामुळे या धर्मनिरपेक्षतेकडे ज्या दृष्टिकोनातून पाहिले जाते यावर त्याची व्याख्या केली जाते. इतकेच नव्हे तर धार्मिक संस्थाना शासनाकडून आर्थिक सहाय्याची तरतूद देखील केली गेली आहे.

**सेक्युलॅरिझमचे वास्तव आणि कांही प्रश्न**

सेक्युलॅरिझम या शब्दाच्या अर्थानुरुप आचरण भारतीय समाजात फार पूर्वीपासून दिसून येत होते. पण जेव्हा राजकारण या शब्दाला जोडले गेले म्हणजे संविधानात हा शब्द घालण्यात आला आणि नंतर42 वी घटना दुरुस्ती अंमलात आणण्याचा जसा प्रयत्न झाला तसे त्याचे रुप बदलून गेले आणि अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागले. सर्वधर्मसमभावाची जागा धार्मिक सांप्रदायाच्या कुरघोडीची दिसून येऊ लागली. तरी देखील विचारवंतानी हा संधिकाळ असून यांतून सेक्युलॅरिझमच उदयास येऊन सर्व जण त्याचे पालन करतील येथ पासून आता नवीन घडामोडी, भारताचे सांस्कृतिक वैभवाचे वास्तव व त्याचा वारसा याचा विचार लक्षांत घेऊन सेक्युलॅरिझमची नव्याने व्याख्या करण्याची वेळ आली आहे असे विचार मांडले आहेत. वरील तात्त्विक विवेचन सकृत दर्शनी योग्य वाटत असले तरी व्यवहारात या सेक्युलॅरिझमचे वेगवेगळे रुपे बघायला मिळतात व प्रश्नांची मालिका समोर येते.

*समाजशास्त्रज्ञ अथवा विचारवंत यांच्या मते धर्मनिरपेक्षता फक्त राज्यसंस्थेचे धोरण नसावे तर ते समाजव्यवहारांचे साधन बनले पाहिजे. प्रत्येक नागरिकाच्या मानसिकतेत त्याच्या वागण्यात, बोलण्यात ते तत्त्व दिसले पाहिजे तरच देश धर्मनिरेपक्ष बनतो.*

धार्मिक विचाराच्या लोकांचे म्हणणे असते कीं, धर्मनिरपेक्षतेचे धोरण हे राज्य शासनाने स्वीकारले आहे. समाजाला त्याच्या मर्जीनुसार कोणते धोरण अमलांत आणावे यांची परवानगी आहे. लोकशाहीमध्ये अशी जबरदस्ती करता येणार नाही. वास्तविक सेक्युलर हा शब्द संविधानात येण्याअगोदर हजारो वर्षापासून येथे सहिष्णूतेचे समाज जीवन कार्यान्वित होत होते. हा शब्द आल्याने धार्मिक सांप्रदायांच्या मानसिकतेत वेगळाच बदल दिसून येत आहे. त्याची परिणीती सेक्युलॅरिझमची व्याख्या नव्याने करण्यापर्यंत होत आहे. धार्मिकता व तिचा आग्रही अतिरेक कर्मकाण्डाच्या रुपांत दिसतो आहे.

श्री. सुरेश व्दादशीवार सारख्या विचारवंताच्या मते येणारा काळ सेक्युलॅरिझमचाच आहे. *सुरेश व्दादशीवार,* साधना, नोव्हेंबर 2014 या अंकात लिहितात, *धर्मांध शक्ती सध्या उधाण आल्याचे दिसत असले तरी ही विझत्या दिव्याची वाढलेली ज्योत आहे. समाजाने वा व्यक्तिने सेक्युलर होणे ही सामाजिक व व्यक्तिगत पातळीवरील मनोव्यापाराची प्रक्रिया आहे आणि तीही बहुसंख्य माणसांबाबत पूर्ण झाली आहे. त्याना धर्माचा वा धर्मांधतेचा ज्वर चढविणाऱ्या व्यक्ति राजकीय आहेत, त्या वगळता सारी माणसे माणसासारखीच आहेत. हे 'माणूसपण वाढविणे,' हाच सेक्युलॅरिझमचा अर्थ व संदेश आहे. आणि त्याच्या कक्षा दिवसेंदिवस रुंदावत जाणाऱ्या आहेत.*

हा फार मोठा आशावाद वाटतो. 'माणसाचे माणूसपण वाढविणे' हाच जर सेक्युलॅरिझमचा संदेश असेल तर सेक्युलॅरिझम मधील ऐहिक जीवनशैलीचा विचार करता) ज्याची आसक्ती वाढविव्याची मानसिकता असते (हा संदेश अमलांत आणणे कठिण वाटते. वास्तविक हाच मानवतेचा संदेश उपनिषदकारानी दिला आहे.

श्री. सुरेश व्दादशीवार यांच्या म्हणण्याप्रमाणे सेक्युलरिझमची प्रक्रिया बहुसंख्य माणसांबाबत पूर्ण झाली आहे ,हे निरिक्षण फारच आशावादी वाटते. आजही जागतिक स्तरावर 59 %लोक धार्मिक आहेत. धर्मावर विश्वास न ठेवणारे 23 % आहेत तर अगदी निरिश्वरवादी 13 % आहेत. हा सर्वे WIN/Gallup International या संस्थेने Global Index of Religion and Atheism यासाठी केलेल्या मत मोजणीतून आढळून येतो. भारताबद्दल या संस्थेच्या सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की 2005 ते 2012 या काळात धार्मिक लोकांची संख्या 6% ने कमी झाली आहे म्हणजे 2005 साली धार्मिक लोक 87% होते तर 2012 साली ते 81% होते. याच बरोबर हे सर्वेक्षण असेही दर्शविते की निरीश्वरवादी लोकामध्ये 1% कमी झाली आहे. म्हणजे 2005 साली जे 4% अगदी निरीश्वरवादी होते ते 2012 साली 3% झाले. याचा अर्थ असा होतो की लोकांचा ईश्वरावर विश्वास वाढत आहे. हे सर्वेक्षण फक्त जगातील पन्नास हजार लोकांच्या मत चाचणीवर केले गेले आहे ही संख्या जागतिक लोकसंख्येच्या मानाने खूपच कमी वाटते.

यावरून असे जाणवते की, धर्मावर विश्वास न ठेवणाऱ्यांच्या संख्येत जरी वाढ दिसत असली तरी आजही धर्मावर विश्वास ठेवणारे भारतात तरी 81% लोक आहेत. याशिवाय असेही लोक खूप प्रमाणात आढळून येतात जे वरून अज्ञेयवादी किंवा निरीश्वरवादी म्हणतात पण आतून धर्मावर व ईश्वरावर विश्वास ठेवत असतात. याचे द्योतक म्हणजे मंदिरांची वाढती संख्या आणि त्यातील वाढत्या रांगा. तसेच देवस्थानांच्या उत्पनाची वाढती संपत्ती हेच दर्शविते की लोकांचा ओढा धार्मिकतेकडे वाढत आहे. मग तो श्रद्धेपोटी असेल किंवा मानसिक शांतता लाभावी म्हणून असेल. तेव्हा श्री सुरेश व्दादशीवार यांचे सर्वांनी सेक्युलर विचार मनोमन मानला आहे व फक्त काही राजकीय मंडळीमूळे तो पूर्णपणे आपणास दिसत नाही. हे म्हणणे थोडे वेगळे अर्धसत्य वाटते. सेक्युलॅरिझम हीच विचारप्रणाली ऐहिकतेलाच प्राधान्य देत असल्याने भारतीय मनाच्या तात्त्विक व सांस्कृतिकतेला छेद देऊ शकणार नाही. तेव्हा भारतात तरी त्या अर्थाने सर्व सेक्युलर होतील असे वाटत नाही.

**सेक्युलॅरिझमची नव्याने व्याख्या?**

अस्तित्वात असलेल्या भारतीय धर्मनिरपेक्षतेच्या व्यवहारात व वास्तवात जाणवणाeया त्रुटी व त्याचे देशाच्या दृष्टिने कांही अनिष्ट परिणाम याचा पूनर्विचार करुन बदलत्या परिस्थित धर्मनिरपेक्षतेची नव्याने गतिमान व्याख्या करावी असे कॉग्रेसचे निष्ठावंत नेते व विचारवंत खासदार श्री सरदार करणसिंह याना वाटते व 26.6.2015 च्या इंडियन एक्सप्रेसमध्ये तसे सविस्तर लेखातून त्यानी प्रतिपादले आहे. याचा अर्थ असाही होऊ शकतो की, अस्तित्वात असलेली संविधानातील याबाबतची तरतूद अपुरी आहे किंवा तिचे अपयश आहे.

डॉ. करणसिंह या लेखात म्हणतातः

*आपली धर्मनिरपेक्षताही धर्म हा पूर्णपणे वैयक्तिक असून राज्यसंस्थेस त्याचा संबंध नाही. त्यांच्या मते येथे आपली चुकीची समजूत झाली आहे. धर्म व्यक्तिगत असला तरी त्याचा सामुदायिक प्रभाव लक्षांत घेता ती एक सामाजिक शक्ती तयार होते. याची आपल्याला विसरण पडली असावी. कारण धर्मांचा सामुदायिक प्रभाव किंवा धार्मिक सांप्रदायातील संघर्ष याची राज्यशासनाला दखल घ्यावी लागते.*

*दुसरे तत्त्व जे स्वीकारले होते ते म्हणजे आर्थिक व शैक्षणिक सुधारणा झाल्या की, धर्म संकल्पना आपोआप मागे पडेल. पण ही धारणा खोटी ठरली आहे. या उलट सुशिक्षित व अशिक्षित, शहरी वा ग्रामीण समाज प्रथम प्रार्थना मंदिराचा विचार करीत असतो असे एका अभ्यासावरुन दिसून आले आहे. हा विचार सर्व सांप्रदायात जगभर आढळून येतो.*

डॉ. करणसिंहाना खटकणारा मुद्दा धर्माच्या नावाखाली, धार्मिक संस्थाना मिळणारे परदेशी अनुदान/निधी याचा राजकीय उद्देशासाठी होणारा वापर. धार्मिक स्वायत्ततेच्या नावाखाली काही सांप्रदायांच्या आचाराला कायद्याच्या कक्षेबाहेर ठेवले जाते. आणि त्याचा असा दुरोपयोग होतो असे त्याना वाटते.

या लेखांत शेवटी त्याची एक महत्वाची गोष्ट सांगितली आहे. ते म्हणतात 'जेव्हा एखाद्या राष्ट्राला हजारो वर्षाची वैचारिक व सांस्कृतिक परंपरा असते व त्यांच्या मध्यवर्ती विचारधारेला जर एखादे जुनाट खडकाळ अवशेष समजून चालल्यास तेव्हा त्या राष्ट्राची नवनिर्मितीची क्षमता खुंटते.'

त्यांचा रोख भारताच्या वैचारिक व सांस्कृतिक वारसाबाबत असावा. आणि याचा संदर्भ घेऊन नवीन गतिमान धर्मनिरपेक्षतेची (सेक्युलॅरिझम) व्याख्या करावी असे त्याना वाटते.

**आधुनिकता आणि धर्मनिरपेक्षता**

धर्मनिरपेक्षतेची जी वेगवेगळी आकलने आहेत जसे पाश्चात्याना वाटते भारतात धर्मनिरपेक्षताच नाही. किंवा धर्मनिरपेक्षता म्हणजे विशिष्ट धार्मिक सांप्रदायताचे तुष्टीकरण तसेच कांही विचारवंताना आधुनिकता विरोधी असलेल्या लोकांचा धर्मनिरपेक्षतेला विरोध असतो आणि धर्मनिरपेक्षता म्हणजेच आधुनिकता असे सूत्रच निर्माण झाल्याचे जाणवते.

अशा या संबधाचा विचार दोन दृष्टिकोनातून होऊ शकतो.

**धर्माच्या दृष्टिकोनातून**

भारतातील धार्मिक सांप्रदाय, जमाती यांच्या व्यक्तिगत तसेच आर्थिक व सामाजिक विकासावरुन धर्माच्या दृष्टिकोनातून बघता आधुनिकता ही धर्मावर अवलंबून न राहता धर्माच्या बंधनातून सुटून वैज्ञानिक विचारधारेनुसार जीवन जगण्यास प्रवृत्त करते व माणसाला स्वतंत्र बुध्दीने जगण्यास शिकवते. ही आधुनिकतेची व्याख्या पाश्चात्य समाजशास्त्रज्ञांची आहे. पण व्यवहारात आधुनिक जीवनशैलीचे जे चित्र दिसते ज्यांत 'स्वतंत्र बुध्दीने जगण्याची' जागा नैतिकतेला फारसे महत्व न देता स्वैराचाराने व चंगळवादी जीवन जगण्यास प्राधान्य दिल्याचे दिसते. न्यूटन, कार्टेसियन यांच्या तत्त्वानुसार व यांत्रिकी पध्दतीने अर्थ लावून व सर्वांची सरळ मिसळ करुन एक नवीन जगण्याची पध्दती बनून जाते. थोडक्यात जीवनाचा असा आराखडा तयार केला जातो. ज्यांत ज्याने आराखडा तयार केला त्याला कोठेच स्थान नसते. म्हणून आईनस्टाईन याने आधुनिक शास्त्रज्ञाचे वर्णन करताना असे म्हटले आहे, ' हे लोक लाकडाच्या अशा भागांत छिद्रे पाडीत बसतात जेथे ते सोपे असते. 'येथे हे लक्षांत घेतले पाहिजे की, आधुनिकतेला विरोध म्हणजे आधुनिकतेच्या नावाखाली होणाऱ्या चंगळवादाला व स्वैराचाराना विरोध असतो. उलट भारतीयांची आधुनिकतेची कल्पना अशी आहे' ही एक अशी विचारधारा जी गत कालातील कांही संकल्पनांचा त्याग व नविन आशादाई कल्पनांची सुरुवात ज्यामध्ये वैज्ञानिक व मानवतावादी दृष्टिकोन अभिप्रेत असून इतिहासातील कांही संकल्पनांचा विचार केला जातो.

येथे ध्यानांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या संकल्पनेत धर्म व धर्मनिरपेक्षता एकत्र नांदू शकतात असे आढळून येते. तसेच सेक्युलॅरिझमचे पुरस्कर्ते तत्त्वज्ञ होलीओक यांच्या मूळ कल्पनेत धर्मास बाजूला केले नाही. धर्मास विरोध हा फक्त निरीश्वरवादी व कट्टर इहवादी मंडळीचा असतो. पण बुध्दी प्रामाण्यवाद्यामध्ये किंवा राजकारण्यामध्ये जो आधुनिकतेला विरोध करतो तो धर्मनिरपेक्षतेच्या पण विरोधी असतो. अशी भावना होऊन बसली आहे.

आधुनिकतेच्या अथवा धर्मनिरपेक्षतेच्या विरोधांत जाण्यासाठी व्यक्तिविकास व सामाजिक विकास तितकाच महत्वाचा ठरु पहात आहे. हा विकास फक्त आर्थिक निकषावर अवलंबून नसून सर्वांगीण असून ज्यात ऐहिक व अध्यात्मिक या जीवनाच्या दोन्ही अंगाना महत्व आहे. आधुनिकतेतील 'आधुनिक' या शब्दाचे सहचर्य हे विज्ञान आणि मानवतावाद या सुंदर कल्पनाशी निगडीत आहे. विज्ञान निष्ठ मनोवृत्ती आणि मानवतावादी प्रेरकशक्ती यांच्या संयोगामुळेच मानवाची सर्वांगीण उन्तनी साधता येते. तुमचा मानवतावाद विज्ञानाशिवाय असेल तर तो बहुतांशी भावनिक स्वरुपाचा असतो. तुमचे विज्ञान जर मानवतारहित असेल तर त्यामुळे दुर्बल वर्गाची पिळवणूक होईल. असा विचार जर आचरणात आला नाही तर व्यक्ती व समाज त्या आधुनिकतेला व धर्मनिरपेक्षतेला पसंती न देता मूलतत्त्ववादाला कवटाळतो.

वास्तविक सर्वधर्मीयाना आपले व्यक्तिमत्व सुधारण्याची संधी आणि आपल्या क्षेत्रात उच्चपदापर्यंत पोहचण्याची परिस्थिती आणि निःपक्षपणे मतदान करण्यासारखी परिस्थिती ही भारताची मोठीच उपलब्धी आहे. संधीची समानता हे धर्मनिरपेक्षतेचे महत्वाचे तत्त्व आहे. तसे प्रत्यक्षात भारतात दिसून देखील येते.

येथे हे पण लक्षांत घेतले पाहिजे कीं, पहिल्या महायुध्दानंतर अल्पसंख्य आणि बहुसंख्य असे विभाजन झाले. हे जरी रशियात झाले असले तरी त्याचा परिणाम आपल्याकडेही झाला. अल्पसंख्य जमात ही मागास जमात असते ही विचारधारा निर्माण झाली. म्हणून भारतातील अल्पसंख्य मुस्लीम जमात मागास समजली जाऊ लागली. त्याना पुढे येण्यासाठी कांही सवलती देण्यात आल्या तेव्हा ते त्या जमातीचे तुष्टीकरण होत आहे. ही भावना बहुसंख्य समाजात दृढ होऊ लागली. त्याचा परिणाम समान नागरी कायद्याची मागणी होऊ लागली. वरील विश्लेषणावरुन आधुनिकतेला व धर्मनिरपेक्षतेला तात्त्विक विरोध नसून त्यातून निर्माण होणाऱ्या विसंगतीना असतो.

**सारांश**

वरील सेक्युलर-धर्मनिरपेक्षतेच्या तात्त्विक विवेचनावरुन असे जाणवते की, पाश्चात्य सेक्युलॅरिझम व भारतीय संविधानिक धर्मनिरपेक्षता या संकल्पना भिन्न असून त्या राष्ट्राच्या मूळ विचारधारा व सxस्कृतीचा आधारे निश्चित करण्यात आल्या आहेत. पाश्चात्य देशाप्रमाणे भारताला धर्म व राष्ट्र पूर्णतः वेगळे करता आले नाही. व तसे करणे कठीण आहे. भारतीय धर्मनिरपेक्षतेमूळे निर्माण झालेली बहुसंख्य व अल्पसंख्य विचारप्रणाली व त्यातून निर्माण होणाऱ्या जीवननिष्ठा या राष्ट्रनिष्ठेला तडा देणाऱ्या ठरु शकतील. याची वेळीच दखल घेणे गरजेचे वाटते. स्वार्थी व लघुदृष्टीने राजकारण्यानी भारतीय धर्मनिरपेक्षतेचा वापर चालूच ठेवला तर राष्ट्रीय ऐक्यास धोका निर्माण होऊ शकतो. कांही धार्मिक सांप्रदायाना (Religion) धार्मिक स्वातंत्र्याच्या नावाखाली दिल्या गेलेल्या स्वायत्ततेच्या सहुलतींचा पूनर्विचार करुन त्याना मिळणारे परदेशी अनुदान व याच्या नियंत्रणाची कार्यवाही शासकीय पातळीवर होणे गरजेचे आहे.

प्रचलीत धर्मनिरपेक्षेतून अनुभवास आलेल्या काही मर्यादा व धार्मिक सांप्रदायांच्या स्वायत्ततेचा पुर्निविचार यांचा डॉ. करणसिंहानी सुचवल्याप्रमाणे धर्मनिरपेक्षतेची नव्याने व्याख्या/विचार करण्यास हरकत नसावी. कारण व्यवहारात सर्वधर्मसमभाव यामुळे आंतर धार्मिक संबंध टिकून राहतील पण त्याचे रुपांतर राष्ट्रीय ऐक्यासाठी कितपत होईल याचाही विचार करणे गरजेचे वाटते.

हे सर्व साध्य होण्यासाठी आज तरी समोर एकच पर्याय दिसतो आहे ज्याचा सर्वोच्च न्यायालय वारंवार आठवण करुन देत आहे तो म्हणजे राष्ट्रहितासाठी व राष्ट्रासाठी एकच समान नागरी कायदा आणि त्याची यशस्वी अंमलबजावणी. यासाठी राष्ट्रनिष्ठ राजकीय इच्छाशक्तीच्या नेतृत्वाची गरज आहे.

.... समाप्त

dr.rapathak@gmail.com

•••

## शंका समाधान @शाखा

*जयदेव डोळे*

राजकारण....समाजकारण.....मानसिकता

गेली अनेक वर्षे जो युक्तिवाद ऐकू येई, तो आताही ऐकू यावा याचा अर्थ कोणी काहीच बदललेले नाही काय? राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी कोणी काही विधान केले की, संघाच्या पदाधिकाऱ्यांकडून ठरावीक उत्तर येते; ते म्हणजे टीकाकारांनी प्रत्यक्ष संघशाखेवर जावे आणि आपल्या शंकांचे निरसन करवून घ्यावे! गेल्या महिन्यात काँग्रेसचे उपाध्यक्ष राहुल गांधी यांनी संघावर टीका करताच केंद्रीय मंत्री पी. राधाकृष्णन यांनी त्यांना असाच सल्ला दिला. एक तर असा सल्ला राहुल गांधीच काय, अन्य कोणताही टीकाकार पाळणार नाही हे जितके खरे, तितकेच खरोखर कोणी टीकाकार शाखेवर येऊन गेले आणि त्याने/तिने आपले मत बदलले असेही झाल्याचे आढळून आले नाही. दुसरे, एखाद्याने टीका केली रे केली की त्या वैचारिक, तात्त्विक, तार्किक प्रत्युत्तर न देता शाखेवर या, सारे समजेल असेच देणे संघावर उलटू शकते. कारण संघ आता केंद्रात व राज्यांत भाजपच्या रूपाने सत्तेत आहे. अगदी किरकोळ उदाहरण द्यायचे झाल्यास मांसाहाराचे देता येईल. मांस खाणे मना करणाऱ्या संघाला तुम्ही खाऊन तर बघा अन मग बोला असे सुनावल्यास पटेल का ते? हिंदू स्त्रियांनी चार मुले जन्मास घालावीत असे जेव्हा संघाचा एक कार्यकर्ता म्हणतो, तेव्हा त्याला आधी अनुभव घ्यायला सांगितले तर संघ ऐकेल काय? कोणी कशीही टीका केली तरी त्याला प्रत्यक्षानुभवाचा प्रसाद घ्यायला सांगायचे ही एक पळवाट झाली. इस्लाम अमुक तमुक आहे असे जेव्हा एखादा हिंदू म्हणतो, तेव्हा एखाद्या मुसलमानाने त्याला इस्लाममध्ये या, सारे मत पालटेल असे सुनावणे जितके चुकीचे आहे, तितकेच संघ या शाखेवर आणि आपले डोळे उघडून घ्या असे म्हणणे गैर आहे.

संघ असे सतत सांगत राहतो तेव्हा तो सर्वसामान्यांच्या समजुतीचा व जगरहाटीच्या एकाच बाजूचा लाभ घेत राहतो. ती बाजू म्हणजे व्यक्तीविषयी, जातीविषयी, संस्थेविषयी, पुस्तकाविषयी वा कोणत्याही वस्तूविषयी ज्ञान नसताना मत व्यक्त करू नये. बहुतेक सामान्य माणूस माहीत नाही वा सांगता येत नाही असे उत्तर देऊन त्याच्यासमोर झालेल्या काही वादग्रस्त आणि टीकास्पद विधानांविषयी आपली बाजू स्पष्ट करतो. त्याला खरोखर काही माहीत नसते हे जसे खरे असते तसे त्याला त्याविषयी काही ठोस सांगायचे नसते हेही खरे असते. काही माहीत नसताना बोलणे हा आगाऊपणा झाला. खेरीज फजितीही होऊ शकते. अनुभव हाच खरा शिक्षक हे प्रत्येक जाणतो. संघ असे गृहीत धरतो की त्याच्यावर टीका करणारे अज्ञानातून व गैरसमजातून टीका करतात. त्यांनी असे माहीत नसताना बोलण्यापेक्षा प्रत्यक्ष शाखेवर जावे आणि गैरसमज दूर करावेत. संघ येथे भारतीय (हिंदू?) माणसाच्या एका व्यंगाचा गैरफायदा घेतो. भारतीय (हिंदू?) माणूस कशावरही पटकन विश्वास ठेवणारा, श्रद्धा बाळगणारा आणि मत बनवणाराही आहे. एखाद्या देवतेचा आशीर्वाद पाळावा यासाठी नवस बोलणे येथपासून जवळपास असाध्य असलेल्या रोगावर अवैज्ञानिक इलाज करून पाहणे असे

असंख्य प्रयोग भारतीय (हिंदू?) माणूस रोज करीत असतो. तो कोणाचे तरी ऐकतो आणि करून पाहावे असे ठरवून ते करूनही टाकतो. अनुभव अथवा ठोस निष्कर्ष याकडे तो कधीही पाहत नाही. सांगणाऱ्या व्यक्तीची प्रतिष्ठा, पोच, नाते, अनुभव, सत्ता, वय, जात, पैसा हतबलता याकडे पाहून तो निर्णय करतो. विवेक, शिक्षण, विज्ञान, तर्क याकडे त्याचे दुर्लक्ष होते. म्हणूनच रोज आपण फसवणुकीच्या, शोषणाच्या, अन्यायाच्या, पिळवणुकीच्या, छळाच्या, गांजणुकीच्या बातम्या वाचतो, ऐकतो. कोणीतरी कोणावर विश्वास ठेवला म्हणून हे प्रकार घडले हे आपण त्या बातम्या वाचताना, ऐकताना, स्वत:ला सांगत राहतो. तरीही विश्वास, श्रद्धा, समजूत यांच्या आहारी माणूस जातो आणि बऱ्याचदा फटका खातो. अघोरी उपचार, जीर्ण कर्मकांडे, टाकाऊ परंपरा, खोट्या समजुती यांचा पुनरुद्भव पुन:पुन्हा होत राहण्याचे कारण जवळच्यापैकी कोणीतरी त्याविषयी जोर लावलेला असतो. स्वत:विषयी वा भविष्याविषयी वा सुरक्षिततेविषयी साशंक मन मग शरण जाते आणि सांगितल्याप्रमाणे पालन करते. सांगणाऱ्याच्या चांगुलपणाचा संशय न घेता भारतीय (हिंदू?) माणूस बऱ्याच गोष्टी स्वीकारत जातो आणि केवळ सांगोवांगी, बोलवा, अफवा, गावगप्पा, ऐकीव ज्ञान यावर भरवसा ठेवत राहतो. जाहीरनामे दुर्लक्षित केले जाऊन भारतीय राजकारणात साऱ्याच राजकीय पक्षांचे राजकारण भाषणांवर व आश्वासनांवर का चालते याचे कारण या भारतीय (हिंदू?) माणसाच्या अशा स्वभावात आहे. स्मृती व श्रुती यांतच पुष्कळ ज्ञान टिकवून ठेवणाऱ्या आपल्या देशात मनुष्याच्या शब्दावर विश्वास ठेवला जाणारच ना? लिखापढीवर अजूनही भारतीय माणूस अडून राहत नाही. त्याला पटवले, समजावले अथवा वळवले की भागते. पडताळणीचा किंवा खातरजमा करण्याचा ना त्याला सोस असतो ना त्याला तसे करू दिले जाते. आपल्यावर विश्वास नाही का? लिहून देऊ का? असे कोणी कळकळीने सांगू लागले की भारतीय (हिंदू?) माणसाचे काळीज द्रवते व तो गठला जातो. साक्षरता वाढली, कायदे झाले तरीही असंख्य व्यवहार अजूनही तोंडी होतात. शब्द दिला, जबान दिली, वचन दिले, प्रतिज्ञा केली, शपथ घेतली, आणाभाका घेतल्या, हवाला सांगितला हे शब्दप्रयोग अद्याप भारतामधून नाहीसे झालेले नाहीत.

संघ या स्थितीचा लाभ कसा घेतो ते पाहूया. संघाविषयी जे टीका करतात, संघाचे वाभाडे काढतात त्यातील सारेच जण अभ्यासाशिवाय, निरीक्षणाशिवाय वा अनुभवावाचून बोलत नाहीत. अशांना प्रत्यक्षानुभूतीचा प्रत्यय घ्यायला सांगायचे आणि स्वत:विषयी मात्र वाटेल ती अफाट, अतिशयोक्त व अवास्तव प्रसिद्धी करण्याला मज्जाव करायचा नाही अशी दुहेरी चाल संघ खेळतो. संघाची म्हणून अनुभूती दोनदाच येते. एक, संचलन करतेवेळी आणि दोन, एखाद्या दुर्घटनेत मदतकार्य करताना. दोन्ही प्रसंगी संघ गणवेशात असतो हे लक्षात ठेवावे. म्हणजे गणवेश नसलेला स्वयंसेवक काय करतो हे कधी लक्षात घ्यायचे नाही असे यांचे सांगणे असते. शाखेवर शिस्त असते, एकी असते. बळ असते. तेवढेच पाहून व अनुभवून टीकाकारांनी मत पालटावे असे कसे होईल? टीकेचा विषय आणि शाखेतील भारलेले वातावरण यांचा मेळ कसा काय घालता येतो? जातीविषयक टीका केल्यावर दाखवायचे की बघा, शाखेवर कोण कोणत्या जातीचा याचा पत्ताच नसतो. विषमतेची टीका केल्यावर सांगायचे की बघा, हा स्वयंसेवक लक्षाधीश आहे तर हा दरिद्री आहे. येथे उपाशी कोणी नसतो, प्रत्येकाच्या जेवणाची काळजी घेतली जाते इत्यादी. आता शाखेवर स्त्री का नसते? तिरंग्याचे अस्तित्व का नाही? शस्त्रपूजन कशासाठी करायचे? गुरुदक्षिणा म्हणून दिला जाणारा पैसा काळा की पांढरा हे पाहिले जाते का? अहिंसा व सत्यवचन यांची शिकवण का नाही दिली जात? असे प्रश्न उपस्थित करायचे नाहीत. स्वयंसेवकाने नीतिवान असले पाहिजे याबाबतीत शाखेवर बौद्धिक दिले जाते का? याउलट परिस्थितीनुसार वागावे, तत्त्वे बदलावीत, खऱ्याखोट्याच्या भानगडीत पडू नये, राष्ट्रहितासाठी काहीही करावे असे संदेश देणाऱ्या कथा शाखेवर सांगितल्या जातात. म्हणजे सांगणाऱ्या व्यक्तीचे ज्येष्ठत्व, पद आणि कथनाचे कसब एवढ्यावर भरवसा ठेवा याचेच प्रात्यक्षिक

शाखेवर असते. हे पुस्तक वाचा, तो संदर्भ पाहा, स्वतः प्रयोग करा, तज्ज्ञांचा सल्ला घ्या असे काहीही शाखेत कधी सांगितले जात नाही. तरीही शाखेत या, स्वतः पाहा आणि मग संघाविषयी मत ठरवा असे बिनदिक्कत म्हटले जाते. अभ्यासाचे संघाला फार वावडे आहे. संशोधनाची संघाला प्रचंड नावड आहे. विशेषज्ञाचा संघाला फार राग आहे. नवज्ञानाविषयी संघाला फार चीड आहे. तर्क लढवण्यास संघ उत्तेजन देत नाही. युक्तिवादाला संघ त्याज्य ठरवतो. प्रयोगामधून काढलेला तटस्थ निष्कर्ष संघाला साफ नामंजूर आहे. संघ प्रश्न विचारायला कधीही उत्तेजन देत नाही. शंकेखोरांना संघ सदैव धुडकावत आलेला आहे. जिज्ञासेला संघाच्या शाखेवर प्रवेश नाही. विचारस्वातंत्र्याला शाखेवर येऊच दिले जात नाही.

याचा अर्थ कसा लावायचा? संघाची माणसे टीकाकारांना, शंकेखोरांना शाखेवर यायला का सांगतात? याचे मूळ भारतामध्ये बाहेरून जे लोक, टोळ्या, राजे आले त्यांच्या आक्रमणात आहे. संघ आपल्याला खरे हिंदुराष्ट्र समजतो, म्हणून संघावर टीका करणारा तो बाहेरचा आणि आक्रमक! एकदा का संघावर टीका करणारा बाहेरच्यांपैकी ठरवून टाकला की खरा हिंदुस्थान कसा आहे हे यांना ठाऊकच नाही असा कांगावा करणे सोपे जाते. ते टीकाखोर म्हणजे एका अर्थाने हल्लेखोर व परके! त्यांना हिंदू कसा समजणार? म्हणून त्यांना खरा हिंदू समजावून घ्यायचा असेल तर शाखेत यावे लागेल.

टीकाकारांचे, शंकेखोरांचे मुद्दे कितीही योग्य असोत, संघ त्यांची नेहमी थट्टा करतो किंवा त्यांचा उपहास करत राहतो. तुमच्यासारख्या लोकांच्या टीका आम्हावर काहीही परिणाम करू शकत नाहीत हे दाखवण्याचाही एक खटाटोप संघाचा असतो. म्हणजे नवे विचार, नवज्ञान, अथवा परिवर्तने आमच्या शाखेवर निष्प्रभ ठरतात हेही दाखवायचा संघाचा इरादा असतो. आमचा इतिहास, आमचे पूर्वज, आमच्या परंपरा व व्यवस्था इतक्या योग्य आहेत की त्यांत बदल वा सुधारणांची अजिबात गरज नाही हेच संघ सुचवत असतो.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे चार भिंतीत बसून संघ काय करतो याचा अनुभव कधीही बाहेरच्यांना येत नाही. उघड्यावर, आकाशाखाली जेवढे दाखवता येईल तेवढेच संघ खुले ठेवतो. म्हणजे संघ आरपार पारदर्शक असतो. प्रामाणिक असतो का? मोकळेपणाचा आव आणून संघ आपली कावेबाज आणि कुटिलवृत्ती दडवून ठेवतो. यावर संघ म्हणेल की खुल्या अधिवेशनात सर्वच राजकीय पक्ष आगंतुकांना, अनाहूतांना बसायची परवानगी देतात. कार्यकारिणीचे ठराव जगाला सांगितले जातात. संघाचे सारे कामकाज गोपनीय असते. संघ भारतीय नागरिकांना जबाबदार नसतो. संघ ब्राह्मणी श्रेष्ठत्वाचे मूर्तिमंत उदाहरण आहे. तो इतरांचे जीवन संचालित करणार, त्यांचे नियमन करणार. स्वतः मात्र कोणाचेही बंधन पाळणार नाही. अगदी राज्यघटनेचेसुद्धा बचावात्मक पवित्रा म्हणून संघ आपल्या शाखेवर टीकाकारांना बोलावतो. तुम्ही म्हणता तसे आक्षेपार्ह येथे काही नाही असे दाखवून आपल्यावरील हल्ले चुकवायचाही संघाचा डाव असतो. चाणक्यनीतीचे पालन करताना शत्रूंना चकवा देणे, त्यांचे लक्ष दुसरीकडे गुंतवणे, त्यांना नरमाईने पेश होणे असे डावपेच संघ करीत असतो. एकदा का शत्रूचे शंकासमाधान झाले की आपण आपल्या मूलकार्याला लागायचे हे त्याचे पक्के गणित असते. म्हणून संघात या व खात्री करून घ्या अशी आमंत्रणे देत असतो.

( परिवर्तनाचा वाटसरू च्या सौजन्याने.)

●●●

# जीर्णशीर्ण हवेलीतला मार्क्सवादी!

*प्रवीण बर्दापूरकर*

चरित्र...चिकित्सा....इतिहास

संसदेच्या कॉरीडॉर किंवा प्रांगणात अनोळखी असणाऱ्याने जरी अभिवादन केले तरी आवर्जून सस्मित प्रतिसाद देण्याचा सुसंस्कृतपणा जपणारे तसेच आपण कोणी तरी बडे राजकीय आसामी आहोत याचा मागमूसही न लागू देता दिल्लीच्या सांस्कृतिक वर्तुळात सहजपणे वावरणारे सीताराम येचुरी आता मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जनरल सेक्रेटरी म्हणजे 'सेनापती' झाले आहेत. थोडक्यात सांगायचे तर, जनाधार गमावल्याने सध्या अत्यंत हालाखीच्या अवस्थेत असणाऱ्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ते आता भारतातील सर्वोच्च नेते आहेत. चेहेऱ्यावर मुक्कामाला आलेले हलकेसे स्मित, कपाळावर उडणारी केसाची एक-दोन झुल्पे तसेच नजरेत भरणाऱ्या दोन उभ्या अठ्या आणि चुरगळलेला कुडता घातलेला माणूस म्हणजे सीताराम येचुरी! वर्णाने गव्हाळ आणि कांती तुकतुकीत असणारा हा माणूस राजकपूरप्रमाणे कधी गोर-गरीबांतला वाटलाच नाही. त्यामुळे कोणत्या तरी विद्यापीठातून राज्यसभेत पोहोचलेला एखादा स्वत:वर खूष असणारा प्राध्यापकाला शोभेशी देहबोली तसेच विद्वत्ता आणि ओतप्रोत भरलेला आत्मविश्वास ही त्यांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये. बोलणे सभागृहात असो की, सभेत की पत्रकारांशी बोलताना माईकसमोर , सीताराम येचुरी एका आश्वासक संथ लयीत आणि कोणताही कर्कश्शपणा ना येऊ देता बोलणार!

12 ऑगस्ट 1952रोजी तेव्हाच्या मद्रास आणि आताच्या चेन्नईत जन्मलेल्या सीताराम येचुरी यांचा उभा जन्म दिल्लीत गेला. दिल्लीच्या सेंट स्टीफन्स महाविद्यालयातून पदवी आणि पंडित जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी मिळवणारे सीताराम येचुरी महाविद्यालयीन जीवनापासूनच कम्युनिस्ट विचाराकडे आकर्षित झाले. एक कम्युनिस्ट कार्यकर्ता म्हणून काम करताना आर्थिक विषयांवर मुद्रित माध्यमांसाठी त्यांनी भरपूर स्तंभलेखन केले; 'Left Hand Drive', 'What Is the Hindu Rashtra' , 'Socialism in 21st Century' ही इंग्रजी तसेच 'घृणा की राजनीती' हे हिंदी; अशी ग्रंथसंपदा त्यांच्या खाती जमा आहे. 2005 पासून राज्यसभेचे सदस्य असणाऱ्या सीताराम येचुरी यांनी संसदेच्या विविध समित्यांवर काम केलेले आहे. एक अभ्यासू सदस्य आणि 'आम आदमी'विषयी सच्ची तळमळ बाळगणारा माणूस अशी मार्क्सवादी पक्षाच्या या नेत्याची प्रतिमा आहे.

कम्युनिस्ट खरे तर भारतात काँग्रेसपेक्षा जास्त जुने. काँग्रेसजण किंवा भारताच्या स्वातंत्र्याची उत्कट आंस बाळगणाऱ्या क्रांतिकारकांपेक्षा ब्रिटिशांना कम्युनिस्ट जास्त धोकादायक वाटत! एकेकाळी म्हणजे, सुमारे 40 वर्षापूर्वी कम्युनिस्ट पक्ष केडरबेस्ड पक्ष कसा असावा याचे उदाहरण म्हणून राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय असे. या चळवळीला बी.टी. रणदिवे, अजय घोष, श्रीपाद अमृत डांगे, ईएमएस नाम्बुद्रीपाद अशी वलयांकित नावे नेतृत्व म्हणून लाभली. आमच्या पिढीने पत्रकारितेत उडी घेतली तेव्हा चारू मुजुमदार यांच्या नावाची क्रेझ तेव्हा बुद्धिवंतांच्या वर्तुळात होती एखाद्या चित्रपटाच्या हिरोपेक्षा जास्त चर्चेत होते. तेव्हा नक्षलवादी चळवळ नुकतीच रुजली होती. गडचिरोली-चंद्रपूर जिल्ह्यात म्हणजे महाराष्ट्राच्या सीमेवर जेव्हा नक्षलवाद्यांनी प्रवेशासाठी थाप मारली तेव्हा प्रा. सुरेश द्वादशीवार, राजाभाऊ पोफळी, प्रकाश दुबे आणि आस्मादिक अशी काही पत्रकार मंडळी त्यांचे लेखनातून स्वागत करायला हजर होतो. विषमता नष्ट करायला निघालयाचा तेव्हा दावा केलेल्या (आणि नंतरच्या काळात त्याबाबत निराशा करणाऱ्या) चळवळीचे उद्गाते चारू मुजुमदार समजले जात. ढोबळमानाने या पक्षात सोव्हिएत

रशियाधार्जिणे आणि चीनधार्जिणे असे दोन प्रवाह होते. मॉस्कोत बर्फवृष्टी झाली तर भारतातले कम्युनिस्ट भर उन्हाळ्यात थंडीने काकडतात आणि माओला ऊसन भरली तर भारतातील कम्युनिस्टांची पाठ दुखते, असे तेव्हा गमतीने म्हटले जायचे. पण ते असो! या 'धार्जिणे'पणातून पक्षातील या दोन्ही विचाराच्या गटात मतभेद होते; पुढे ते मतभेद तीव्र होत गेले. मूळ भारतीय कम्युनिस्ट पक्षातून स्वत:ला लोकशाहीवादी म्हणवून घेत काही कम्युनिस्ट स्वत:ला 'मार्क्सवादी' म्हणवून घेत बाहेर पडले. ते वर्ष होते 1964. तेव्हा मूळ कम्युनिस्ट म्हणजे उजवे आणि मार्क्सवादी म्हणजे डावे-पुरोगामी-लोकशाहीवादी अशी सर्वसाधारणपणे विभागणी होती. पण, या दोन पक्षातील दोन समान बाबी उल्लेखनीय आहेत; एक- सत्तेसाठी हे दोन्ही गट एकत्र होते आणि पश्चिम बंगाल, केरळ, त्रिपुरा अशा काही राज्यात हे दोन्ही गट युती करून सत्तेत सहभागी होते. दोन- राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि आधी जनसंघ व नंतर भारतीय जनता पक्षाचा विस्तार चिरडण्यासाठी हे दोन्ही कम्युनिस्ट पक्ष हिरीरीने पुढाकार घेत. हा विरोध अनेकदा रक्तलांच्छित झालेला आहे. दोन्ही बाजूकडील कार्यकर्त्यांच्या सांडलेल्या रक्ताचे डाग अजूनही त्या-त्या प्रदेशाच्या राजकारणावर आहेत.

कम्युनिस्ट, मार्क्सवादी आणि या दोन्ही गटांशी नाळ न जुळलेल्यांनी स्थापन केलेला फॉरवर्ड ब्लॉक या क्षीण अस्तित्व असलेल्या तीन पक्षांचा गड होता तो पश्चिम बंगाल. काँग्रेसचा एकछत्री अंमल मोडून सिद्धार्थ शंकर रे यांना पायऊतार करत कम्युनिस्ट युतीच्या ज्योती बसू यांनी या पश्चिम बंगालवर मुख्यमंत्री म्हणून सर्वाधिक काळ राज्य केले. एक वेळ केंद्रात अशी आली की, लोकसभेत काँग्रेस अल्पमतात, विरोधी पक्षात एकही पक्ष देशव्यापी आणि बहुमताच्या जवळपास नाही अशी बिकट राजकीय परिस्थिती निर्माण झाली. अशावेळी विविध पक्षांची आघाडी स्थापन करून ज्योती बसू यांनी पंतप्रधानपद सांभाळण्याबद्दल जवळजवळ एकमत झाले होती. पण, 'हट्टीपणा करणार नाहीत तो कम्युनिस्ट सापडणारच नाही' असे जे म्हणतात त्याला स्मरून पक्षाने पंतप्रधानपद न स्वीकारण्याचे आदेश ज्योती बसू यांना दिले. दोन्ही कम्युनिस्ट पक्षांच्या पक्षाच्या भारतात सुरु झालेल्या घसरणीची ही सुरुवात होती. त्यातच पी. व्ही. नरसिंहराव पंतप्रधान असताना तत्कालिन अर्थमंत्री मनमोहनसिंग यांनी आणलेल्या जागतिकीकरण आणि खुल्या अर्थव्यवस्थेचा वेध तसेच परिणाम न जोखता दोन्ही कम्युनिस्ट पक्ष (हळूहळू कालबाह्य ठरू पाहणाऱ्या) आयडियालॉजीला चिकटून बसले. त्यामुळे तरुण वर्ग दुरावत गेला. ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालात आधी स्थानिक स्वराज्य संस्था, मग विधानसभा आणि गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत या दोन्ही कम्युनिस्ट पक्षांना धूळ चारली .

1964 साली स्थापन झालेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने खरे तर देशात चांगल्यापैकी जम बसवला होता . सुमारे वीस पेक्षा जास्त राज्यात पक्षाचे डोळयात भरण्यासारखे अस्तित्व होते. लोकसभेत तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून अनेक वर्ष मार्क्सवादी पक्ष मिरवला. महाराष्ट्रात तर काही वेळा विधानसभेत जनसंघ आणि नंतर भारतीय जनता पक्षापेक्षा जास्त सदस्य मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे असत. मार्क्सवादीप्रणित विद्यार्थी विंग असलेली एसएफआय, तरुणांची डीवायएफआय, सिटू ही कामगार संघटना, बँक कर्मचाऱ्यांची बलवान संघटना मोठा बोलबाला होता. 1991 साली राजीव गांधी यांची हत्या झाल्यावर देशात प्रचंड राजकीय अस्थिरतेचा काळ सुरु झाला तेव्हापासून ते 1999 मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार केंद्रात अस्तित्वात येईपर्यंत; मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तत्कालिन सरचिटणीस हरकिशन सुरजित हे देशातील राजकारणात एक प्रमुख 'की मेकर' म्हणून कामगिरी

बजावते झाले. 1992 ते 2005 असा प्रदीर्घ काळ सरचिटणीसपद भूषविलेल्या सुरजित यांच्या शब्दाला या काळात 'सोन्या'चा भाव होता!

आता वयाची साठी उलटल्यावर सीताराम येचुरी यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची सूत्रे स्वीकारली आहेत. तरी आतापर्यंत झालेल्या सर्व सरचिटणीसांत तेच सर्वात तरुण म्हणायला हवेत कारण, वयाची सत्तरी तरी पार केल्याशिवाय 'या' काय किंवा 'त्या' काय कम्युनिस्ट पक्षात या पदासाठी कोणाचा विचारच होत नव्हता. संदर्भ बदलले तरी मुळार्थ तोच असणारी पण गतिमान झालेली अर्थ व्यवस्था आणि वाढता दहशतवाद यामुळे चिंताग्रस्त असलेल्या जगाचे भान बाळगत पोथीनिष्ठतेशी त्याची सांगड घालत पक्षाची पुन्हा बांधणी करणे ही तारेवरची कसरत येचुरी यांना करावी लागणार आहे. राजकीय आघाडीवर ज्याला शत्रू समजून मार्क्सवाद्यांनी कायम दूर ठेवले तो काँग्रेस पक्ष मोडकळून पडलेला आहे. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीएचे सरकार असताना अणुकराराला विरोध करण्याची जी टोकाची असमंजस, हट्टी भूमिका तत्कालिन सरचिटणीस प्रकाश कारत यांनी घेतली आणि पक्षाला घ्यायला लावली त्यामुळे भारतातील मार्क्सवाद्यांना आधुनिकतेशी जुळवून घेता येत नाही असा संदेश गेला; परिणामी बराच मोठा सुशिक्षित मतदार पक्षापासून दुरावला. ममता बॅनर्जी यांनी तर या पक्षाचे कंबरडेच सहज दुरुस्त न करता येण्याइतके मोडून ठेवलेले आहे. पक्षाच्या आतापर्यंतच्या आयुष्यात ज्यांच्याशी कडवा संघर्ष केला, प्रसंगी रक्त सांडले आणि सांडवले, तो भारतीय जनता पक्ष देशात क्रमांक एकवरच नाही तर केंद्रासहसह अनेक राज्यात सत्तेत आलेला आहे.

आणखी एक महत्वाची बाब म्हणजे, भारतातील राजकीय पक्ष आणि एकूणच राजकीय चळवळीचे 'कार्पोरेटायझेशन' झाले आहे. आता केवळ उमेदवार, त्याची आणि त्याच्या राजकीय पक्षाची प्रतिमा, त्याचे चारित्र्य. केडरबेसड कार्यकर्ते निवडणूक जिंकल्यावर काय करणार याची जाहीरनाम्यातून दिलेली हमी. या आधारे निवडणुका लढवण्याचे दिवस इतिहासजमा झालेले आहेत. धर्म-जात-पंथ-पक्ष-धन आणि गुंडशक्ती अशा अनेक 'अन्य' बाबी महत्वाच्या ठरल्या आहेत. हे वास्तव आता पोथीनिष्ठ कार्यकर्त्यांना कळून चुकले आहे आणि बहुसंख्येने कार्यकर्तेही या 'कार्पोरेटायझेशन'चा एक भाग झालेले आहेत. त्यामुळे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची केवळ संघटनात्मक चौकट मोडून पडली आहे एवढ्यापुरती ही बिकट राजकीय परिस्थिती मर्यादित नाही तर; आहे त्या बहुसंख्य कार्यकर्त्यांना मरगळ आलेली आहे, ते निराश झालेले आहेत आणि त्यांची उमेदही हरवलेली आहे. थोडक्यात सांगायचे तर, जनाधार आणि विश्वासार्हता गमावलेले जे समाजवादी 'जनता परिवार' नावाने अस्तित्वाची लढाई खेळण्यास सज्ज झालेले आहेत त्यापेक्षाही प्रत्यक्षात जास्त वाईट अवस्था मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची झालेली आहे. एखाद्या जीर्णशीर्ण हवेलीसारखा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आता भासू लागलेला आहे आणि त्यातून ऐकू येणारे पूर्ववैभवाचे स्वर आता विरलेल्या गतकातर आठवणींची उदास विराणी झालेली आहे.

या अत्यंत कठीण विपरीत परिस्थितीतून सीताराम येचुरी कसा मार्ग काढतात हे पाहणे म्हणूनच उत्सुकतेचे आहे.

साभारः www.praveenbardapurkar.com/newblog

praveen.bardapurkar@gmail. com

●●●

# शोषितांमध्ये असंघटित मध्यमवर्गीयही

*सीताराम येचुरी*

समाज....विकास....खाउजा

कामगार चळवळ हे डाव्या पक्षांचे एक महत्त्वाचे कार्यक्षेत्र. परंतु, काळ जसा बदलतो आहे, त्यानुसार कामगार लढ्यांची रणनीतीही बदलावी लागेल, हे लक्षात घेण्याची गरज आहे. कार्ल मार्क्स यांचा विचार हा या लढ्यांचा मुख्य स्रोत राहिला; परंतु मार्क्स यांच्या काळात त्यांच्यासमोर जो 'औद्योगिक कामगार' होता, तो जसाच्या तसा आजच्या काळात नाही. कामगार किंवा मजूर ही संकल्पना बऱ्याच अंशी बदलली आहे. हा बदल समजावून घेऊनच कामगार चळवळींनी काम केले पाहिजे. भारतात जागतिकीकरणाच्या काळात कामगार वर्ग हा मध्यमवर्गात बदलल्याचे म्हटले जाते. खरे तर या वर्गाला मध्यमवर्ग असे म्हणणेही अन्यायकारक ठरेल. कारण हा वर्गही मालक वर्गाच्या शोषणाचा तेवढाच बळी ठरत असतो. हाताने कष्ट करणाराच नव्हे, तर बुद्धीने श्रम करणारा नवा वर्ग या नव्या शोषणव्यवस्थेचा बळी ठरतो आहे. मात्र कामगार हा कोळशाच्या खाणीत काम करणारा असो, की संगणकावर बसून काम करणारा असो, शोषणाची पद्धती बदलली तरी त्याचे शोषण तर सुरूच आहे. भारतातील नव्या सरकारच्या आर्थिक सुधारणा व भूसंपादनासारखे कायदे या कामगार व शेतकरी वर्गासह सर्वसामान्य जनतेच्याही सरळसरळ विरोधात आहेत.

डावी चळवळ हा कामगार चळवळीचा आधार होता व आहे. आपल्याकडे संसदीय लोकशाहीत मजूर व मालक यांच्यातील अंतर्विरोधात अनेक गोष्टींची सरमिसळ झाली आहे. आज जातीयवादाच्या चेहऱ्याआड समाजाचे राजकीय ध्रुवीकरण वेगात आहे. कामगार-मजुरांच्या एकीलाही या धर्मांध शक्तींनी धोक्यात आणले. भारतातील वर्गशोषण हे आर्थिक व सामाजिक, अशा दोन पायांवर उभे आहे. ते बंद होत नाही तोवर आम्ही या लढ्यात पुढचे पाऊल टाकू शकणार नाही.

'जेथे कारखान्यांच्या चिमणीतून धूर निघतो त्या त्या कारखान्यांच्या प्रवेशद्वारावर लाल बावटा दिसलाच पाहिजे, ही घोषणा महाराष्ट्राने देशातील कामगार चळवळीला दिली. आज बदललेल्या काळात 'ज्या गावातील विहिरीवर दलित-शोषितांना पाणी भरू दिले जात नाही, त्या त्या प्रत्येक विहिरीवर लाल बावटा फडकलाच पाहिजे', ही नवी भूमिका ठोसपणे मांडणे गरजेचे आहे. डाव्या कामगार चळवळीने उदारीकरणाच्या या युगात यापूर्वीच ही भूमिका उच्चरवाने मांडलेली आहे.

जागतिक कामगार दिनाचा जन्मच या उद्देशाने झाला, की देशोदेशींच्या कामगारांच्या हिताचे कायदे व्हावेत. किमान 8 तास काम, आठवड्यातून एकदा सुटी, किमान वेतन हे सारे कायदेकानून आज कंत्राटी पद्धतीच्या जमान्यात जणू अदृश्य झाल्याचे चित्र आहे. देशातील कामगार चळवळीसमोरील आजचे एक प्रमुख आव्हान म्हणजे देशातील संघटित कामगारवर्गात झालेली घट होय. हा संघटित कामगार एकूण कामगारवर्गाच्या केवळ 7 टक्क्यांवर आला आहे. उर्वरित 93 टक्के कामगार आज कामगार कायद्याच्या कक्षेच्या बाहेर गेले आहेत. त्यामुळे हक्कांबाबत भांडण्यासाठी त्याच्याकडे कोणतेही कवच नाही. हीदेखील चिंताजनक बाब आहे. उदारीकरणाच्या काळात आउटसोर्सिंगचा सपाटाच लागला आहे. गेल्या काही वर्षांत तर पक्की नोकरी द्यायचीच नाही, असा नियमच कंपन्यांनी केला आहे. साहजिकच कंत्राटी पद्धतीवर सारा भर व जोर आहे. 'कॉन्ट्रॅक्ट' हा एकच शब्द मालक वर्गाला साऱ्या

जबाबदाऱ्यांपासून दूर करतो. या मोठ्या असंघटित कामगारांना संघटित करणे हे आमच्या पक्षाच्या कामगार चळवळीचे ध्येय आहे. आमची घोषणाच 'ऑर्गनाइज द अन्ऑर्गनाईज्ड' ही आहे. या वर्गासाठी ठोस कायदे झाले पाहिजेत. त्यांची अंमलबजावणीही झाली पाहिजे. देशातील नव्या सरकारने तर कामगार कायद्यात बदल करण्याचाही घाट घातला आहे. ज्या कारखान्यात किमान 10 मजूर असतील तेथे कंपनी कायदा लागू होईल ही अट शिथिल करून ती 20 ते 50 कामगारांपर्यंत वाढविण्याच्या हालचाली सुरू आहेत. याला कडाडून विरोध राहील.

उदारीकरणाच्या धोरणानंतर आपल्या देशात कामगार वर्गाला संभ्रमित केले गेले. कामगारांचे शोषण हे भांडवलशाही व्यवस्थेतील चिरंतन सत्य आहे. ते लपविण्यासाठी कामगार हा त्या-त्या उद्योगांचाच भाग किंवा घटक आहे, असे भासविले जाते. आकर्षक पे पॅकेज हे मृगजळही तयार केले गेले. 'मेक इन इंडिया' सारख्या घोषणा होऊनही देशात बेरोजगारी वाढत चालली ही वस्तुस्थिती आहे. काही वर्षांपूर्वी 'मनरेगा' कायदा आला व त्यामुळे किमान ग्रामीण भागांतील तरुणांच्या हातांना काही काम मिळत होते. देशातील नव्या राजकीय व्यवस्थेने तर तेही हिसकावून घेण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. "मार्क्सवाद म्हणजे ठोस परिस्थितीचे ठोसपणे केलेले विश्लेषण," असे लेनिनने म्हटले होते. त्याचा वारसा सांगणाऱ्या देशातील डाव्या कामगार चळवळीला परिस्थितीनुरूप आणि कालानुरूप बदलणे अपरिहार्य झाले आहे. आम्ही आमची विश्लेषणे, मागण्या, आंदोलने हे सारेच बदलत्या काळानुसार बदलण्याची मानसिक तयारी ठेवणे हा कामगार दिनी केलेला सर्वांत मोठा संकल्प ठरावा! बदल झाला नाही, केला नाही, तर झपाट्याने बदलणाऱ्या परिस्थितीत टिकाव लागणे कठीण आहे, याची सुस्पष्ट जाणीव आम्हाला आहे. मात्र, बदलणे याचा अर्थ शोषितांच्या, श्रमिकांच्या, कामगारांच्या भल्यासाठी आणि त्यांच्यावर जेथे जेथे अन्याय होईल त्याविरुद्ध लढण्याचा मूलभूत सिद्धांत बदलणे, असा निश्चित नाही. तो लढा तर चालूच राहणार.

(शब्दांकन: मंगेश वैशंपायन)
सकाळच्या सौजन्याने

●●●

## राक्षसाची पाउले

*संजीव खांडेकर*

खाउजा.....विकास....विकास

शेतकऱ्यांच्या दु:खाबद्दल, आत्महत्यांबद्दल विस्तृत परिपूर्ण अभ्यासू व हृदयस्पर्शी अशी एकत्रित माहिती आपल्याला पी. साईनाथ यांच्या लेखनाने व 'दुष्काळ आवडे सर्वांना' अशा पुस्तकातून मिळाली. शेतकऱ्यांची परवड समजली. त्यांचे बुडीत अर्थव्यवहार कळले. त्यांच्या कर्जाची सावकारी गणिते व त्यापायी होणारी पिळवणूक दृष्टीस पडली. त्यांच्या जीवनात निसर्गाच्या अनियमिततेमुळे येणारी अनिश्चितता, अनिश्चिततेच्या सारख्या वाहणाऱ्या चिंतांमुळे जीवनात जाणवणारी पराभवाची सल, अर्थशून्यता, सततच्या फसवणुकीमुळे निर्माण झालेली भीती, राजकारणात, बदलाच्या निर्णयप्रक्रियेत डावलले गेल्यामुळे आलेले एकाकीपण, शहरीकरण व तंत्रज्ञानामुळे बदलत जाणाऱ्या भवतालाबरोबर जुळवून न घेता आल्याचे अपराधीपण, संकोचत जाणारे भावविश्व, तुटलेपण, तळ गाठलेली गरिबी

अशा भारतीय खेडय़ातील माणसाचे, शेतकऱ्याचे, शेतमजुराचे, शेतीवर अवलंबून असलेल्या छोटय़ा कारागिरांचे, लहान व्यावसायिकाचे जीवन गेली काही वर्षे पुन:पुन्हा आत्महत्यांच्या अविरत आणि अगणित घटनांमुळे आपल्यासमोर वारंवार येत आहे.

सरकारी योजना, कर्जमाफी, स्वस्त वा विनामूल्य वीज, पाणी, शेतकरी- शेतमजुरांची आंदोलने अशी अनेक कामे व चळवळी यंत्रणा व विरोधी आवाज यांतून अनेक वर्षे जाऊनही आत्महत्यांची संख्या फारशी कमी होताना दिसत नाही. अनेक कोरडे अर्थतज्ज्ञ, आकडय़ांच्या करामती करणारे अभ्यास निबंध, आत्महत्या हा खासगी निर्णय आहे, असे म्हणणारे अर्थशास्त्रज्ञ आणि सनसनाटी चर्चा घडविणारे टीव्ही चॅनल्सचे पोपटपंच या पलीकडे जाऊन आत्महत्यांचा मानसशास्त्रीय राजकीय व तात्त्विक अभ्यास करून त्यावरील चिंतनातून बदलाच्या व्यापक उपायांचे काम हाती घेतलेले दुर्दैवाने जाणवत नाही.

शेतकऱ्याबरोबरच शहरातील असंघटित कामगारांच्या, शेतकाम सोडून शहरात आलेल्या व झोपडपट्टीत राहणाऱ्या माणसांच्या, बेकार तरुणांच्या, स्त्रियांच्या व नव्या वेगवान- 'टबरे' भांडवलशाहीच्या बाजारपेठेसाठी उभ्या राहिलेल्या मॉल्स, बांधकाम उद्योग, कॉल सेंटर्स आदी अनेक नव्या व तुटपुंज्या पगारात काम करणाऱ्या असंघटित चाकरमान्यांच्या आत्महत्येविषयी एकत्रित अशी माहिती आपल्याकडे पुरेशी संकलित झालेली नाही. ती जर असती तर या दोन्ही वेगवेगळ्या जीवन पद्धतीत किती व कशी कीडा-मुंग्यांसारखी स्वत:च स्वत:ला माणसे मारून टाकीत आहेत याची कल्पना येईल.

नव्वदीच्या दशकात मुक्त झालेल्या बाजारपेठेपाठोपाठ, अजस्र भांडवल अनिर्बंध व अतिवेगवान संचाराला सुरुवात झाल्यानंतर, जागतिकीकरणाच्या रेटय़ानंतर समाजाच्या शहरी व ग्रामीण भागात आत्महत्येचे अखंड सत्र अधिक स्पष्टपणे सुरू झाले काय? आत्महत्येचे शेवटचे मानसिक स्वरूप टोकाचे डिप्रेशन- खिन्नता, औदासीन्य व त्यातून आलेले अतिटोकाचे तुटलेपण- विथड्रावल असते. असे एक भयंकर औदासीन्य साऱ्या जगभरच जगण्याच्या इच्छेला झाकोळून टाकत आहे काय? डिप्रेशनचे वेगवेगळे व निरनिराळ्या देशांत विविध समाजसमूहांत केलेले अभ्यास अधूनमधून प्रसिद्ध होत असतात. ते भयावह आहेत. आपला शेजारचा जवळपास प्रत्येकजण म्हणजे सारा समाजच खिन्न आणि उदास झाला आहे काय? हॅपिनेस इंडेक्स किंवा आनंदाचे मानक दिवसेंदिवस अशक्त होत जात असल्याचेही निष्कर्ष विविध समाजमानसशास्त्रज्ञांनी काढलेले वारंवार वाचनात येतात. एका बाजूला विकासाच्या भल्याथोरल्या तुताऱ्या फुंकल्या जात असताना उदासीनतेची काळी छाया अधिक अधिक गडद होताना का दिसावी! की विकासाचे गणित जे नवभांडवलशाहीच्या, जिचे एक नाव 'सेव्ह कीप भांडवलशाही' म्हणजेच अतिएकांडी, स्वत:पुरते व स्वत:साठी जगायला लावणारी, अतिमुक्त बाजारपेठेमुळे माणसाला माणसापासून तोडणारी जी व्यवस्था, तिच्यातच बिनसलेले उदासपण आहे? वरवर पाहता अतिवेगवान शहरी जीवन व दुसरीकडे तुलनेने संथ दिसत असलेले ग्रामीण जीवन अशी विभागणी असली तरीही या दोन्ही जीवनांतील नव्या मुक्त बाजारपेठेचा धागा समान आहे. संपर्क साधनांच्या नव्या जाळ्यामुळे दोन्हीकडे वाढलेले सांस्कृतिक व भवतालाचे भकासपण, बकालपण जवळपास सारखेच आहे. भाषाव्यवहारातून त्यांचे होणारे प्रगटीकरण स्पष्ट आहे.

जीवनातील प्रत्येक संस्थेचे मग ते शिक्षण असो वा उद्योग, शासन असो वा कुटुंब, अशा सगळ्याचेच झपाटय़ाने होत असलेले 'कार्पोरेटायझेशन' फारसे वेगळे नाही. शेतीमध्ये घुसलेले प्रगत बी-बियाणांचे राजकारण, खते-औजारे आदींचे

अर्थकारण व नव्या शहरांसाठी उत्पादित करावयाच्या शेतमालाचे- बाजाराभिमुख व्यवस्थाकरण हे शहरी जीवनपद्धतीसारखेच तणावपूर्व, स्पर्धाखोर व चंगळवादी जीवनाचे सौंदर्यमानक किंवा मापदंड असलेले आहे.

सर्व भांडवलशाहीच्या ज्या टोकावर आज आपण उभे आहोत, जिथे कुणीच कुणाचे नाही त्या व्यवस्थेत औदासीन्य किंवा डिप्रेशन हा दैनंदिन जीवनाचा भाग न बनला तर नवल; परंतु आपण उदासीन नाही, तंदुरुस्त आहोत, हसतो, मजा करतो, असे भासवत जगण्याची सध्याच्या स्पर्धाखोर जगात सक्ती आहे. स्वत:ला (स्वत:च्या खिन्नतेला) दाबून हसऱ्या चेहऱ्याने काढलेली व सतत काढलेली, ती पुन्हा फोटोशॉप करून गुळगुळीत केलेली सेल्फी- हे या समाजाचे सेल्फपोर्टेट आहे. प्रत्येक एका 'यशस्वी' आत्महत्येमागे जवळपास 'वीस अयशस्वी ' आत्महत्यांचे प्रयत्न असतात हे जागतिक हत्येचे अभ्यास निष्कर्ष शेतकऱ्यांच्या व कष्टकऱ्यांच्या आत्महत्यांच्या निष्कर्षांपुढे फिके पडतील अशी आपल्याकडील दैना आहे.

साऱ्या जगभर आत्महत्येची साथ पसरली आहे काय, हा प्रश्न गैर तर नाहीच; पण तो कोणालाच कसा घाबरवत नाही? एखाद्या दहशतवादी हल्ल्यापेक्षा मोठ्या संख्येने आपल्या आजूबाजूची माणसे मरत असताना आपण त्याची दखल 'खासगी निर्णय', 'भित्रा डरपोक माणूस' अशी किंवा आणखी कोणत्या तरी निबर वक्तव्याने व निर्लज्जपणे कशी करू शकतो?

शेतकऱ्याची, कष्टकऱ्याची, बेकाराची, शहरी उद्योगातील कामगाराची, जर्मन विंगच्या पायलटची ते अगदी दहशतवादी आत्मघातकी पथकातील तरुणाची आत्महत्या यांना नव्या जगाच्या भांडवली जगाचा, 'सोव्ह की प' अर्थव्यवस्थेचा, उत्सवी चंगळवादाचा, बेफाम पिळवणुकीचा एकच धागा जोडत तर नसेल ना?

आत्महत्यांच्या अभ्यासाची जी पहिलीवहिली मोठी कामे झाली त्यातील कार्ल मार्क्सने केलेल्या कामाची मला मुद्दाम आठवण करून द्यावीशी वाटते. हद्दपारीनंतर पॅरिसमध्ये राहत असताना त्याने 1843 च्या सुमारास जॅक पेशे याने लिहिलेल्या, संकलित केलेल्या पॅरिसमधील, मुख्यत: स्त्रियांच्या आत्महत्यांच्या पुस्तकाचे भाषांतर केले व त्यासाठी प्रस्तावना लिहिली. या लिखाणात मार्क्सचे स्त्रीविषयक दृष्टिकोन जसे प्रगट होतात, तसेच मुख्यत: भांडवली समाजात माणसाचे त्याच्या स्वत:च्या सामर्थ्यांपासून व शेवटी स्वत:पासून दूर जाणे कसे अपरिहार्य ठरते, या परात्मतेतून येणाऱ्या तुटलेपणातून कसे अटळ डिप्रेशन निर्माण होते व अशा खिन्नतेतून माणूस मृत्यूला कसे कवटाळतो याचे हृदयद्रावक वर्णन आहे.

समाजापासून दूर गेलेला 'अपार एकटा' माणूस ही व्यवस्था कशी घडविते हे तो प्रस्तावनेतच सांगतो. अमर्याद मालमत्ता जमवण्याचे व ती स्वत:च्या मर्जीनुसार उधळण्याचे मुक्त बाजारपेठेचे कायदे प्रबळांची अर्थव्यवस्था कशी निर्माण करतात व अशी व्यवस्था प्रबळांच्या विकासाचीच वाट कशी ठरते, सामान्य माणसाला अशी व्यवस्था कशी ठोकरते याचे विवेचन आपले पंतप्रधान व त्यांचे सल्लागार यांनी वाचले तर त्यांना त्यांचा भूमी बळकाव कायदा शेतकऱ्याच्या कसा विरोधात आहे आणि त्यांची विकास नीती इथल्या धनदांडग्यांना किती धार्जिणी आहे याचेच नव्हे, तर अशा व्यवस्था सामान्यांच्या जीवनात स्वत:च्याच हत्येची बिजे कशा रोवतात याचेही आकलन होईल. भांडवली अर्थव्यवस्थेत माणसाला एकटे बनवल्यानंतर येणाऱ्या टोकाच्या नैराश्य भावनेचे स्वत:च्या खुनात रूपांतर कसे होते याचे विवेचन करताना फ्रॉइड जन्माला येण्यापूर्वीच 'इच्छांच्या दमना'ची जाणीव त्याला झाली होती व व्यवस्थाबदल हा त्याचा उपाय होता हे आपल्याला त्याचे आत्महत्येवरील पुस्तक वाचताना समजते. आज सुमारे 175 वर्षांनंतर भांडवली व्यवस्थेने जीवनाचा प्रत्येक कण आणि आयुष्याचा प्रत्येक क्षण व्यापलेला असताना खिन्नता, नैराश्य व

स्वत:च्या एकटेपणातून, स्पर्धाखोरीच्या पराभवातून निर्माण झालेला स्वत:चा तिरस्कार किती घनदाट झाला असेल याचेच प्रत्यय आपल्या समाजात पसरलेल्या हत्येच्या साथीतून मिळतात.

पी. साईनाथ व इतर अन्य संशोधकांनी नगदी पीक घेणाऱ्या, अतिआधुनिक किंवा जी. एम. आदी बियाणे वापरून, महागडी औषधे व संप्रेरके वापरणाऱ्या शेतकऱ्यांपैकी गळ्यात फास अडकवणाऱ्यांची संख्या मोठी असल्याचे दर्शविले आहे याचा अर्थ काय? कोणत्या प्रकारची व्यवस्था व तिची मागणी, मागणीचा दबाव माणसाला असह्य होतो याकडेच हे आकडे लक्ष वेधतात. बाजारपेठ निर्णय घेईल व मुक्त म्हणजे प्रबळांच्या हाती असलेली बाजारपेठ निर्णय घेईल अशी विधाने वारंवार व उच्चवर्गीयांच्या व्यासपीठावरून जेव्हा केली जातात तेव्हा समाजातील लोकशाही निर्णयप्रक्रियेच्या पाठीत खंजीर खुपसून तिला घायाळ केले जाते. अशा घायाळ समाजात हुकूमशाहीची दुंदुभी उघडपणे वाजविणे जेव्हा शक्य होते तेव्हा पर्यावरणाचे इशारे धुडकावून, कायद्याचा बडगा उगारून, शेतकऱ्याच्या मुलाला विकासाचे वेड लावून, तळच्या माणसाची घरे-दारे उद्धस्त करून, दिखाऊ घमघमाटी व चमकदार रंजनाचे उत्सव मांडून निवडून आलेले सरकारच बळीराजाचे नव्हे तर 'बळी तो कानपिळी'मधल्या बलवानाचे एजंट किंवा बटीक बनते. विचारवंत अशा वेळी 'शेतीत राम नाही, विकून टाका, व्यवसाय करा' असे दीडशहाणे सल्ले देऊ लागतात.

कोणता व्यवसाय, कोणी करायचा, कोठे करायचा? त्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण? उत्पादन व विक्रीची व्यवस्था? कोणासाठी करायचा? असल्या प्राथमिक प्रश्नांचाही अशा वेळी ऊहापोह केला जात नाही. शेती फायद्याची नाही म्हणून जमीन विकायची असेल तर त्या जर्मन विंग्जच्या चालकाने जेव्हा स्वत:सकट दीडशे निष्पाप जीवांचा खून केला तेव्हा त्याने काय विकायचे होते वा विकत घ्यायचे होते? उठताबसता अमेरिकन व्यवस्थेचे तळवे चाटणाऱ्या अशा अनेक तज्ज्ञांना अमेरिकेतला दुष्काळ व त्यामुळे उद्भवलेला पर्यावरण व सामाजिक आर्थिक प्रश्नांचा गुंता दिसत नाही काय? नव्वदीच्या दशकात माइक डेव्हिसने लिहिलेल्या 'इकॉलॉजी ऑफ फिअर'पासून अलीकडच्या 'प्लॅनेट ऑफ स्लम्स'पर्यंतच्या पुस्तकातून ही मंडळी काहीच शिकणार नाहीत काय? शहरी कामगार असो वा ग्रामीण शेतकरी असो, त्याची आत्महत्या हा त्याचा 'खासगी निर्णय' नाही, ती त्याची गळचेपी आहे, व्यवस्थेने तो त्याच्यावर लादलेला निर्णय आहे. अशा हत्यांच्या रोगाची साथ पसरणे ही व्यवस्थेच्या विरुद्ध उमटलेली नकाराची शोकांतिका आहे. अशा शोकाकुल समाजात तरीही संपत्तीच्या माजावर जमीन बळकाव वा पर्यावरण धुडकाव असे कायदे लादणे ही हुकूमशाहीचीच नांदी नव्हे तर आपल्या दरवाजावर उमटलेली राक्षसाची पाउले आहेत.

लोकसत्ताच्या सौजन्याने

sanjeevkhandekar@gmail.com,

•••

## जिकडे पैसा जास्त तिकडे आयाआयटीयन्स

*प्रभाकर मोरणकर*

शिक्षण....मानसिकता....चिकित्सा

मागच्या आठवड्यात बेंगळुरूमधील आयआयएसच्या पदवीदान समारंभात इन्फोसिसचे एक संस्थापक नारायण मूर्ती यांनी सर्वोत्तम शिक्षणाचा दावा करणाऱ्या आयआयटी व आयआयएम या शिक्षणसंस्थांमधून बाहेर पडणारे विद्यार्थी

काय संशोधन करतात, यावर नेमकेपणाने बोट ठेवलं आहे. एकप्रकारे त्यांनी उच्चशिक्षणाचं ऑडिटच केलं आहे. नारायण मूर्ती यांचं म्हणणं बरोबर आहे. त्याची कारणं माझ्या दृष्टिकोनातून अशी आहेत की, आयआयटीमधून बाहेर पडलेले बहुसंख्य विद्यार्थी परदेशात गेले. तिथे त्यांनी वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये ज्या नोकऱ्या स्वीकारल्या, त्या सगळ्या रुटीन स्वरूपाच्या होत्या. त्यात स्वतंत्र संशोधनाला फारसा वाव नव्हता. तिथेसुद्धा विद्यापीठांमध्ये फार कमी जण गेले. भारतात जे थोडेफार राहिले, त्यांच्याही नोकऱ्या अशाच स्वरूपाच्या होत्या. रिसर्च अँड डेव्हलपमेंट लॅबोरेटरी हे खातं सरकारच्या अखत्यारित आहे. त्यात पगाराचं कोष्टक आयआयटी पदवीधराच्या दृष्टिकोनातून तेव्हा कमी होतं. याउलट, खासगी कंपन्यांमध्ये सेल्स, मार्केटिंग यात त्यांना जास्त पगाराच्या नोकऱ्या मिळत होत्या. त्यामुळे रिसर्च अँड डेव्हलपमेंट लॅबोरेटरी मध्ये फारसं कुणी दाखल झालं नाही. जे विद्यार्थी जॉइन झाले, त्यांना थोडंफार काम करता आलं. उदा. रॉकेट रिसर्चमध्ये आपण बरंचसं काम केलेलं आहे. परम संगणकामध्ये आपल्याकडे चांगलं काम झालेलं आहे.

आयआयटीला साधारणपणे 1950 पासून सुरुवात झाली. खरगपूर आयआयटी 1953-54 मध्ये सुरू झाली, मुंबई आयआयटी 1957 मध्ये सुरू झाली. म्हणजे साठेक वर्षं तरी नक्कीच झालेली आहेत; पण राष्ट्रीय स्पिरिटचा अभाव, भौतिकतेकडे जास्त कल, यामुळे अनेक जण परदेशात जाणं पसंत करतात. तिकडे गेलेल्यांपैकी संशोधनाकडे फारसं कुणी वळत नाही. परदेशात इझी लाइफस्टाइल मिळते, पगार व्यवस्थित मिळतो, दैनंदिन जीवनातल्या ज्या अडचणी भारतात असतात, त्या तिथे नसतात, म्हणून अनेक जण सॉफ्ट ऑप्शनच्या मार्गाने जातात. त्यामुळे फारसं कुणी चॅलेंजिंग काम केलेलं नाही, ही वस्तुस्थिती आहे. माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांचंसुद्धा हेच मत आहे.

हरितक्रांती-धवलक्रांती 60 च्या दशकात झाली असली, तरी त्या क्षेत्रात जे मूलभूत संशोधन या देशाच्या तत्त्वज्ञानावर आधारित व्हायला हवं होतं, ते झालेलं नाही. मूलभूत संशोधनाकडे वळण्याची आयआयटीमध्ये जाऊ इच्छिणाऱ्या, तिथून पदवीधर होऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांची मानसिकता जवळजवळ नसते. वैयक्तिक जीवनात सुखसोयी कशा मिळतील, याकडेच त्यांचा कल असतो. म्हणजे एखाद्या ब्रँचला स्कोप आहे याचा अर्थ काय, तर तिथे जास्त पैसा खेचता येतो असाच घेतला गेला आणि त्यादृष्टीने कामं केली गेली. मूलभूत संशोधन होण्यासाठी राष्ट्रीय अस्मिता लागते. ती पेरली गेली नाही, त्यामुळे ती उगवली नाही. आतासुद्धा तेच दिसतंय. स्वच्छतेचं सांगितलं जात आहे; पण ती आम्ही शाळेत शिकवली का? ते गेल्या साठ वर्षांत झालेलंच नाही. मूलभूत संशोधन सोडून द्या, साधी-साधी शिस्त शिकवलेली नाही. संस्कार-शिस्त दिली गेली नाही. आमचा सुशिक्षित माणूस चौकात सिग्नल लागलेला असला, तरी आपली गाडी दामटवतोच. असे लोक वैयक्तिक चंगळवादामागे जाणार हे उघड आहे. म्हणून नारायण मूर्ती यांचे विचार कटू आहेत; पण सत्य आहेत असं मला वाटतं. मी अनेक वर्षं आयआयटीच्या मुलांना शिकवलं आहे. आयआयटीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन आपल्याला चांगली नोकरी मिळेल असाच असायचा. आम्ही जेव्हा एनडीएसाठीचे वर्ग सुरू केले, तेव्हा त्याला हुशार विद्यार्थी येतच नसत. डिफेन्समध्ये आयआयटीचे पदवीधर फारसे गेलेलेच नाहीत. आर्म्ड फोर्स, एअर फोर्स, नेव्ही यांमध्ये फार कमी प्रमाणात आयआयटी पदवीधर जातात. माझ्या पाहण्यात आयआयटीसाठी निवड झालेला कुठलाच मुलगा पुढे एनडीएकडे वळलेला नाही. रिसर्च अँड डेव्हलपमेंटकडे त्यातलं कुणीच गेलेलं नाही. पदवीनंतर त्यांनी ब्रँच कुठलीही असो, सॉफ्टवेअरमधली नोकरी स्वीकारली. त्यात ते साधंच काम करतात. सॉफ्टवेअरमधलं एखादं डिझाइन कुणीतरी केलेलं आहे. त्या माणसाने

क्रिएटिव्हिटी लावली आहे; पण बाकीचे लोक ते फक्त इम्प्लीमेंट करत करतात. त्याला फारसी क्रिएटिव्हिटी लागत नाही. म्हणून कुठलं मूलभूत संशोधन होऊ शकलेलं नाही. त्यासाठी जे स्पिरिट लागतं ना, ते अब्सेंट आहे.

भारतात किंवा परदेशात नोकरी करणारी आयआयटीतली मुलं सॉफ्टवेअरलाच प्राधान्य देतात. कारण त्यात पगार चांगला आहे. एनडीएकडे न वळण्याचं कारण म्हणजे त्यात पगार कमी आहे. रिसर्च अँड डेव्हलपमेंटमध्ये कदाचित आता पगार चांगले झाले असले तरी 80-90 च्या दशकात खूपच कमी होते.

जर देशाचा इतिहासच परकीय भाषेतून शिकवला जात असेल, तर राष्ट्रीय अस्मिता कशी उभी राहील? सुरुवातीचं ठराविक शिक्षण मातृभाषेतून असायला हवं होतं. त्यातून एकतेची भावना निर्माण होते; पण इंग्रजीमुळे ती झालेलीच नाही. इंग्रजी माध्यमाकडे जो ओढा आहे, त्यातून व्यक्तीची क्रिएटिव्हिटी फारशी पुढे येत नाही. ज्या भाषेत मी जन्मापासून विचार करतो, जी भाषा मी माझ्या आईवडिलांशी बोलतो, त्या भाषेतून मूलभूत संशोधन हे जास्त चांगलं होईल. मातृभाषेतून शिक्षण झालं असतं, तर विद्यार्थ्यांच्या क्रिएटिव्हिटीची पातळीपण जास्त चांगली झाली असती. चीन-जपानचं, जर्मनी यांचं उदाहरण तसंच आहे; पण आपण त्याकडे दुर्लक्ष करण्याची घोडचूक केलेली आहे. त्यामुळे बौद्धिक क्रिएटिव्हिटी मार खाते. कारण पाठांतर करून शिकण्याची वृत्ती विकसित होते. सरधोपट नोकरीत ते चालून जातं.

आयआयटीमध्ये जी टॉप टॅलेंट शिकली, तीच आयआयटीत शिकवायला फार कमी प्रमाणात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांबरोबर आयआयटीमधल्या प्राध्यापकांकडूनही फारसं काही संशोधन झालेलं नाही. प्राध्यापकांमध्येसुद्धा प्रमोशन, पीएफ, निवृत्त झाल्यानंतर किती पैसे मिळणार याची चर्चा जास्त होते. सरकारचंही तसं प्रोत्साहन नसतं. उदा. एअरक्राफ्ट इंडस्ट्रीत तुम्ही विमानाचं डिझाइन करायला लागल्यानंतर ते निर्मितीच्या टप्प्यावर येईपर्यंत विकसनशील देशांना 25 ते 30 वर्षे लागतात. तोपर्यंत आपण केलेलं डिझाइन आउटडेटेड होतं आणि एअरफोर्सचा दबाव असतो की, आम्हाला स्टेट ऑफ दी आर्ट टेक्नॉलॉजी असलेलं पाहिजे. तेव्हा तुम्ही ते परदेशातून विकत घेणंच पसंत करता; पण जेव्हा स्पेस रिसर्चमध्ये आपलं नाक दाबलं गेलं, तेव्हा तोंड उघडलं. उपग्रह अंतराळात पाठवण्यासाठी जे रॉकेट लागतं, ते इतर देशांनी द्यायचं नाकारल्यावर ती डेव्हलपमेंट आपल्याकडे झाली. तेव्हा तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी भारतीय शास्त्रज्ञांना विचारलं की, तुम्ही हे करू शकाल का? तेव्हा त्यांनी ते आव्हान पेललं आणि करून दाखवलं. म्हणजे जिथे आपल्याला स्वातंत्र्य दिलं, तिथे आपण पुढेही जाऊ शकलो. म्हणजे केव्हातरी नाक दाबावं लागतं. तेवढा खंबीरपणा जिथे-जिथे दाखवला गेला, तिथे-तिथे आपल्याकडे संशोधनाचं काम झालेलं आहे. उदा. डिफेन्स आणि सॅटेलाइट. आता आपण इतर देशांचे सॅटेलाइट लाँच करतो. त्यातलं संशोधन मूलभूत नाही म्हणता येणार. इतर देशांकडे जे उपलब्ध होतं; पण त्यांनी आपल्याला न दिल्यामुळे आपण संशोधन करून तो मार्ग शोधून काढला. म्हणजे सक्ती झाली, तेव्हा या गोष्टी होऊ शकलेल्या आहेत.

शिकलेल्या लोकांनी ग्रामीण भारतासाठी किंवा संबंध देश पुढे जाईल या पद्धतीने काम केलेलं नाही. त्यांनी परदेशात जाणं पसंत केलं. तिथंही त्यांनी खूप मर्दुमकी गाजवली असंही झालेलं नाही. कारण त्यांनी सॉफ्ट ऑप्शनच निवडले. भारतीय तत्त्वज्ञान चंगळवादाच्या वाटेने जात नाही; पण पाश्चात्त्य तत्त्वज्ञान चंगळवादाकडे जास्त झुकलेलं आहे. त्याचा प्रभाव मुलांवर जास्त पडतो. आम्ही आमचं तत्त्वज्ञान जर का दिलं असतं, तर ही अस्मिता नक्कीच उभी राहिली असती. पाश्चात्त्य देशांत मूलभूत संशोधन झालं; पण सगळा जगभरचा माणूस पुढे जाईल, यासाठी त्याचा किती वापर झालेला दिसतो? उलट, त्याचा उपयोग त्यांनी इतर देशांवर नियंत्रण मिळवण्यासाठी केलेला दिसतो. आपल्याकडे

चांगलं संशोधन होऊन आपण चांगल्या मार्गाने जाऊ शकलो असतो; पण तो तत्त्वज्ञानाचा पाया आपण हरवला. त्यामुळे क्रिएटिव्हिटीनेही मार खाल्ला. सगळ्याच सावळ्या गोंधळात माणूस त्याला जो मार्ग सोपा वाटतो, तो निवडतो. आमच्या वेळेस जो गोल्ड मेडलिस्ट होता, त्यानेसुद्धा रुटीन जॉब स्वीकारला. त्याच्यानंतरचा जो मुलगा होता, त्याचं क्वॉलिफिकेशन होतं इलेक्ट्रिकल्स इंजिनियरिंगमध्ये. तो बिल्डर झाला. मग, मूलभूत संशोधन होईल कसं? शिक्षणाचा मूलभूत जो आराखडा आहे, तो बदलणं अत्यंत आवश्यक आहे. गुरुकुल पद्धतीचं शिक्षण सुरू करायला हवं. तिथे समाजातल्या इतर गोष्टींचा विद्यार्थ्यांवर प्रभाव पडणार नाही. नीतिमत्ता, प्रामाणिकपणा, संस्कार, शिस्त या गोष्टींचं महत्त्व ज्यात असेल, अशा पद्धतीची शिक्षणव्यवस्था जेव्हा उभी राहील, तेव्हा आपल्याकडे चांगल्या गोष्टी घडू शकतील. मी इतकी वर्षं शिकवलं. आमच्याकडे बघून आमचे विद्यार्थी निदान प्रामाणिकपणे नोकरी करतील. विद्यार्थी शिक्षकाचं चारित्र्य उचलतात. तो प्रामाणिक असेल, तर तेही प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न करतात. शिक्षक निर्व्यसनी असेल, तर विद्यार्थी तसं होण्याचा प्रयत्न करतात. एवढा प्रभाव विद्यार्थ्यांवर नक्की पडू शकतो. पूर्ण प्रभाव काही पडत नाही आणि पडलेला प्रभाव फारकाळ टिकतही नाही. म्हणून मला गुरुकुल पद्धती योग्य वाटते. तिथे विद्यार्थी-शिक्षक यांचा सखोल संबंध येतो. त्यातून चांगला विद्यार्थी घडू शकतो.

आपल्याकडे बुद्धिमत्तेचे जे निकष आहेत, त्यात स्मरणावरच जास्त भर आहे, पण बुद्धिमत्तेच्या अनेक कसोट्या असतात. त्यातून त्या-त्या क्षेत्रातल्या व्यक्तीच्या बुद्धिमत्तेचा विकास होणं आवश्यक असतं. चांगला मूर्तिकार, चांगला चित्रकार तयार होण्यासाठीही बुद्धी लागते; पण आपण ज्याला बुद्धिमान म्हणतो, त्याची फारफार तर स्मरणशक्ती चांगली असते. मी बोर्डात आलो होतो. त्यामुळे मी हे सांगू शकतो की, त्यासाठी फक्त स्मरणशक्तीच लागत होती. आमच्या क्रिएटिव्हिटीचा कस लागला, असं मी म्हणू शकत नाही.

मी मराठी live (26 जुलै 2015) सौजन्याने

saptami@mimarathilive.in

●●●

# प्रतिसाद

### मराठी नियतकालिकांची हतबलता

राम जगताप यांचा आजचा सुधारकात पुन:र्मुद्रीत लेख वाचला. मराठी नियतकालीकांची परवड होत असल्याचे वाचून वाईटही वाटते. पण याला जबाबदार संपादकांची वृत्तीही कारणीभूत असावी असे वाटते. उदाहरण द्यायचे झाल्यास शरद जोशींचा शेतकरी संघटक मोठ्या आवडीने वाचत असूं पण जोशींना सत्तेचे डोहाळे लागून संसदेत स्थिरावले. शिवार नावांच्या कंपनीसाठी शेअर गोळा केले. त्याचे पुढे काय झाले. कळलेच नाही.

साधना साप्ताहिकाने तहहयात वर्गणीची मागणी ग्राहकांकडून केली. यदुनाथजी गेल्यावर काहीकाळ मा. प्रधानसरांकडे त्याच संपादकत्व आलं त्यानी वर्गणी वाढवून फरकाची रक्कम भरा नाही तर अंक बंद केला जाईल असा दम दिला. बरचं मी पत्रातून त्यावेळी लिहिलं होतं ते त्यांना रूचले नसावे. अंक बंद झाला. आजचा सुधारक नि दत्तप्रसाद दाभोळकर यांचा वाद सुधारकातून प्रसिध्द झालेला सर्वश्रृत आहेच.

मराठी मासिक नियतकालिकांची वर्गणी हिंदी साप्ताहिक/मासिकाच्या तुलनेत बरीच अधिक आहे, हे मराठी नियतकालिकं चालविणाऱ्यांनी ध्यानी घ्यायला हवं. दुसरं तुमचा एक ठराविक लेखकवर्ग आहे. गांव खेड्यातल्या अल्प शिक्षिताची काही मत असतात. त्याचे लिखाणाला या नियतकालिकातून स्थान मिळत नाही. तुमचचं इतरांनी वाचावं ही देखील मुजोरीच म्हणावी लागेल. एका चांगल्या विषयाला वाचा फोडलीत, अभिनंदन!

मोरेश्वर वडलकोंडावार, मूल जि. चंद्रपूर.

mwadlakondawar1945@gmail.com

**आजचा सुधारक, सप्टेंबर 2015चा अंक**

डॉ. पाठक यांनी 1950 मध्ये secular शब्द भारतीय घटनेत आल्याचा उल्लेख केलाय (पान 9). तो बरोबर नाही. ती देणगी आहे 1976च्या घटना दुरुस्तीची. याचा उल्लेख त्यानी पुढे केलाय.

त्याच लेखात खजगी आयुष्यात धर्म न सोडता धर्म निरपेक्षता राबवता येते याचे उदाहरण म्हणून इंदिरा गान्धी आणि आंबेडकर यांचा उल्लेख आहे. ही दोन्ही उदाहरणे वेगवेगळ्या कारणांसाठी ठीक वाटत नाहीत. आंबेडकर खाजगी आयुष्यात निधर्मीच राहिले. त्यांचा बौद्ध धर्म म्हणजे निषेधाचे एक वाजवी हत्यार होते. इंदिरा गान्धींनी धर्माचा उपयोग (किंवा दुरुपयोग) राजकारणात भिन्दरवालेच्या रुपात केला आणि त्याची किंमतही मोजली.

वालावलकरांचे विचार नेहमीच प्रामाणिक वाटतात. अप्रिय सत्य सांगण्याचे धाडस ते करतात. तीच गोष्ट माधव गाडगीळांची एका वेगळ्या संदर्भात.

राम पुनियानी यानी सुफी परंपरे विषयी सांगितलय. इस्लामच्या कट्टरवाद्यांनी सुफीशी समझोता केला असे ते म्हणतात. वस्तुस्थिति याच्या उलट आहे अस दिसत. भारतात चिश्ती सोडले तर बहुतेक सुफी तरीके राज्यकर्त्यांच्या जवळ गेले. मात्र सुफ़ी आणि भक्ती संप्रदायात साम्य आहे आणि इब्न अराबी आणि गझ्लीचे तत्त्वज्ञान अद्वैताशी किंवा एकत्वाशी (Monism) बऱ्यापैकी मिळते जुळते हे निर्विवाद. आसू आता धर्माचे महत्व - नाईलाजान का होईना - मानू लागलाय का? पुनियानी यांचा लेख त्या दृष्टिने महत्वाचा.

आसू नक्कीच वाचण्याजोगा आणि विचार करण्याजोगा. भारतीय किंवा हिंदू परंपरात जे काही (थोडं-फारं) चांगलं आहे ते नजरेआड केलं नाही तर आसूची पत आणि प्रसार आणखी वाढेल असं मला वाटतं.

शशिकांत पाडळकर

padalkars@gmail. Com

•••